# महाराष्ट्र विधानपरिषद

## दुसरे अधिवेशन, २०२६

---------------------------------------------

**तारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**बुधवार, दिनांक ०१ जुलै, २०२६ / आषाढ १०, १९४८ (शके)**

| | |
|---|---|
| **(१) मुख्यमंत्री**<br>**(२) पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री**<br>**(३) इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धव्यवसाय विकास, दिव्यांग कल्याण, अपारंपारिक ऊर्जा मंत्री**<br>**(४) पर्यटन, खनिकर्म, माजी सैनिक कल्याण मंत्री**<br>**(५) माहिती तंत्रज्ञान, सांस्कृतिक कार्ये मंत्री**<br>**(६) परिवहन मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |

-----------------------------------------

**प्रश्नांची एकूण संख्या - ३३**

-----------------------------------------

### पुणे शहरातील रेडीमिक्स कॉंक्रीट प्रकल्पांतून निघणाऱ्या सांडपाण्यामुळे मुठा नदीचे प्रदूषण होत असल्याबाबत

**(१) * ८९५८ श्री.योगेश टिळेकर, श्री.अमित गोरखे, श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहर, कोंढवा-हडपसर आणि वडगाव खुर्द या परिसरातील अनधिकृत रेडीमिक्स कॉंक्रीट (आरएमसी) प्रकल्पांतून निघणारा राडारोडा व सांडपाणी थेट मुठा नदीत मिसळत असल्याने नदीचे पाणी प्रदूषित होत असून, सदर प्रकल्पांमुळे हवेत धुळीचे साम्राज्य पसरल्याने परिसरातील नागरिकांना फुफ्फुसाचे व श्वसनाचे आजार होत असल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोंढवा-हडपसर परिसरात कोणत्याही विभागाची रीतसर परवानगी न घेता पुणे महानगरपालिका, पोलीस प्रशासन व प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्या संगनमताने अनधिकृत रेडीमिक्स कॉंक्रीट प्रकल्प सुरू असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणाची चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने सदर अनधिकृत प्रकल्प तातडीने बंद करुन तसेच कर्तव्यात कसूर करणाऱ्या व सदर अनधिकृत कृत्यांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत तसेच उक्त परिसरातील व मुठा नदीचे प्रदूषण रोखण्यासाठी कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) व (२) हे खरे नाही.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अहवालानुसार पुणे शहर परीसरात रेडीमिक्स काँक्रीट (आरएमसी) प्रकल्पांतून निघणाऱ्या सांडपाण्यामुळे मुठा नदी प्रदूषित होत असल्याची बाब महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या निदर्शनास आली नसल्याबाबत कळविण्यात आले आहे.

आरोग्य अधिकारी, पुणे महानगरपालिका यांच्या दिनांक ११/०६/२०२६ रोजीच्या अहवालानुसार पुणे महानगरपालिका क्षेत्रात फुफ्फुसाच्या व श्वसनाच्या आजारांच्या रूग्णसंख्येत माहे मार्च, २०२६ च्या तुलनेत माहे एप्रिल, २०२६ मध्ये वाढ झाल्याचे दिसून येते. तथापि, सदर श्वसनाचे विकार वायुप्रदूषणामुळेच झाले असल्याचे निश्चितपणे सांगता येत नसल्याचे नमूद करण्यात आले आहे.

(३) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत प्रदूषणास कारणीभूत प्रकल्पांची उद्योगांची नियमितपणे पाहणी करण्यात येते. पाहणी दरम्यान त्रुटी आढळून आल्यास दोषी उद्योगांवर नियमांनुसार कारवाई करण्यात येते.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मडळामार्फत अद्यापपर्यंत विविध रेडीमिक्स काँक्रीट (आरएमसी) प्रकल्पांना १० कारणे दाखवा नोटीस, ३४ प्रस्तावित निर्देश, १४ अंतरीम निर्देश, २८ प्लांटला बंदचे आदेश बजावण्यात आले आहेत. तसेच पुणे महानगरपालिकेमार्फत लोहगाव, पुणे शहर येथील १३ आर.एम.सी.प्लांट्स हटविण्याची कारवाई करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे महसूल विभाग, पुणे महानगरपालिका व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांनी संयुक्तपणे केलेल्या कारवाईमध्ये एकूण आठ आरएमसी उद्योगांना उत्पादन बंद करण्याचे निर्देश दिले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## त्र्यंबकेश्वर (जि.नाशिक) येथील मंदिरात व्हीआयपी दर्शनासाठी हजारो रुपये घेऊन भाविकांची फसवणूक करण्यात येत असल्याबाबत

**(२) * ८६७६ श्री.सुनिल शिंदे, श्रीमती भावना गवळी, श्री.किशोर दराडे, श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) त्र्यंबकेश्वर (जि.नाशिक) येथील मंदिरात व्हीआयपी दर्शन करून देण्याकरिता भाविकांकडून अवैधरित्या मोठ्या रकमेची वसुली करून फसवणूक होत असल्याप्रकरणी मंदिराच्या एका विश्वस्ताला अटक करण्यात आल्याची बाब दिनांक १४ एप्रिल, २०२६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्र्यंबकेश्वर येथील सुरक्षारक्षकांनी काही महिन्यांपूर्वी भाविकांसोबत वाद करुन त्यांना गंभीर स्वरूपाची मारहाण केली असल्याचे तसेच दर्शनरांगेत प्रतीक्षा टाळण्यासाठी ३ ते ५ हजार रुपये घेऊन अल्पावधीत दर्शन घडवून देण्याचे गैरप्रकार सुरू असल्याचेदेखील निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मंदिर परिसरातील अनधिकृत 'व्हीआयपी दर्शन' देण्याच्या व्यवस्थांवर नियंत्रण ठेवण्यासाठी आणि भाविकांची फसवणूक टाळण्यासाठी पोलीस व देवस्थान प्रशासनामार्फत आतापर्यंत कोणत्या प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात आल्या आहेत,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आणि त्र्यंबकेश्वर (जि.नाशिक) येथील मंदिरात व्हीआयपी दर्शन करून देण्याकरिता भाविकांकडून अवैधरित्या रक्कम वसूल करणाऱ्यां दोषींवर कडक कारवाई करण्याबाबत तसेच भविष्यात अशा घटना घडू नयेत यासाठी अधिकृत दर्शन सुविधेबाबत भाविकांमध्ये जनजागृती करण्यासाठी कोणती विशेष यंत्रणा राबविण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

न्यासाचे एक विश्वस्त श्री.पुरुषोत्तम कडलग यांनी त्र्यंबकेश्वर मंदिरात व्हिआयपी दर्शन करून देण्याच्या नावाखाली भाविकांकडून अवैधरीत्या मोठ्या रक्कमेची वसुली करून फसवणूक केल्याप्रकरणी पोलिसांनी दिनांक १४ एप्रिल, २०२६ रोजी त्यांना अटक केली असून सध्या ते न्यायालयीन कोठडीत आहेत.

(२) अंशत: खरे आहे.

सुरक्षारक्षक आणि हरियाणा येथील भाविक यांच्यामध्ये गर्भगृह प्रवेशावरून बाचाबाची झाली होती. व त्यादरम्यान भाविकाला मारहाण केल्याचे आरोप झाले होते. सदर घटनेची न्यायालयीन चौकशी चालू आहे.

देवस्थान परिसराबाहेर भाविकांकडून दर्शन रांगेत प्रतिक्षा टाळण्यासाठी ३ ते ५ हजार रुपये घेऊन अल्पावधीत दर्शन घडवून देण्याचे प्रकार होत असल्याबाबतच्या तक्रारी देवस्थान प्रशासनाकडे प्राप्त झाल्या होत्या. देवस्थान प्रशासनाने ऑगस्ट २०२४ पासून आजपर्यंत पोलीस निरीक्षक, त्र्यंबकेश्वर पोलीस स्टेशन, ता.त्र्यंबकेश्वर, जि.नाशिक यांचेकडे वेळोवेळी पत्रव्यवहार करून सदर तक्रारी सादर केल्या आहेत. या बाबत पोलीस तपास पूर्ण होऊन तक्रारींमध्ये तथ्य असल्याबाबतचा अहवाल /निष्कर्ष अद्याप प्राप्त झालेला नाही.

(३) मंदिर परिसरातील अनधिकृत व्हिआयपी दर्शन व्यवस्थांवर नियंत्रण ठेवण्यासाठी आणि भाविकांची फसवणूक टाळण्यासाठी पोलीस प्रशासन आणि देवस्थान प्रशासनातर्फे खालील प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत.

१. भाविकांना अनधिकृत व्हिआयपी दर्शन घडवून देणाच्या नावाने फसवणूक करणाऱ्या समाजकंटकांचे फोटो व माहिती फलक देवस्थान तर्फे मंदिर परिसरामध्ये लावण्यात आले आहे.
२. ऑनलाईन व बायोमेट्रीक फेस रिडिंग सिस्टीम ची दर्शनबारी अद्ययावत केलेली आहे.
३. गुप्त वेशातील पोलीस व सुरक्षारक्षक देवस्थान परिसरात तैनात केलेले आहेत.
४. जनजागृतीबाबतचे फलक देवस्थान परिसरात लावलेले आहेत.
५. देवस्थान कार्यालयात कायम स्वरूपी दोन पोलीस कर्मचारी तैनात केलेले आहे.
६. देवस्थानने अधिकृत दर्शन सुविधा पास रुपये २००/- केलेली आहे. आणि अति तातडीचे अधिकृत दर्शन व्यवस्था रुपये २५००/- करण्यात आलेली आहे. तसेच देवस्थानची वेबसाईट अपडेट करण्यात आलेली आहे.

(४) मंदिर परिसरातील अनधिकृत व्हिआयपी दर्शन व्यवस्थांवर नियंत्रण ठेवण्यासाठी आणि भाविकांची फसवणूक टाळण्यासाठी पोलीस प्रशासन आणि देवस्थान प्रशासनातर्फे खालील प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत.

१. भाविकांना अनधिकृत व्हिआयपी दर्शन घडवून देणाऱ्या नावाने फसवणूक करणाऱ्या समाजकंटकांचे फोटो व माहिती फलक देवस्थान तर्फे मंदिर परिसरामध्ये लावण्यात आले आहे.

२. ऑनलाईन व बायोमेट्रीक फेस रिडिंग सिस्टीम ची दर्शनबारी अद्ययावत केलेली आहे.

३. गुप्त वेशातील पोलीस व सुरक्षारक्षक देवस्थान परिसरात तैनात केलेले आहेत.

४. जनजागृतीबाबतचे फलक देवस्थान परिसरात लावलेले आहेत.

५. देवस्थान कार्यालयात कायम स्वरूपी दोन पोलीस कर्मचारी तैनात केलेले आहे.

६. देवस्थानने अधिकृत दर्शन सुविधा पास रुपये २००/- केलेली आहे. आणि अति तातडीचे अधिकृत दर्शन व्यवस्था रुपये २५००/- करण्यात आलेली आहे. तसेच देवस्थानची वेबसाईट अपडेट करण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कानगाव व पाटस (ता.दौंड, जि.पुणे) येथील सिमेंट प्रकल्पांमुळे परिसरातील वायू प्रदुषणात वाढ झाल्याबाबत

**(३) * ९३२८ श्री.सदाशिव खोत, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.अमित गोरखे, डॉ.परिणय फुके, श्रीमती चित्रा वाघ, श्री.हेमंत पाटील, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कानगाव व पाटस (ता.दौंड, जि.पुणे) येथील ‘श्री सिमेंट’ व ‘अदानी सिमेंट’ या प्रकल्पांतून निघणाऱ्या वायु व धुलिकणांच्या उत्सर्जनातून मोठ्या प्रमाणावर प्रदूषण होत असून, सदर प्रदूषणामुळे परिसरातील शेतीपिकांचे प्रचंड नुकसान, पर्यावरणाचा ऱ्हास तसेच स्थानिक नागरिकांमध्ये श्वसनाच्या आजारांचे प्रमाण वाढल्याने संतप्त ग्रामस्थांनी आंदोलने केली असल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने गत सहा महिन्यांमध्ये या प्रकल्पांची प्रत्यक्ष पाहणी करून हवेच्या गुणवत्तेची तपासणी केली आहे काय, संबंधित कंपन्यांकडून ‘कार्य संमती’ (Consent to Operate) देताना विहित केलेल्या अटी व शर्तींचे (उदा. एअर फिल्टर्स, धूळ नियंत्रण यंत्रणा) उल्लंघन होत असल्याचे तपासणीत आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कानगाव व पाटस (ता.दौंड, जि.पुणे) येथील सिमेंट प्रकल्पांमुळे होणारे प्रदूषण रोखण्यासाठी व बाधित शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळवून देण्यासाठी तसेच नियमांचे उल्लंघन करणाऱ्या दोषी कंपन्यांवर ‘पर्यावरण संरक्षण कायद्या’ अंतर्गत दंडात्मक कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे अंशत: खरे आहे.

प्रश्नाधिन परिसरातील प्रकल्पांमुळे वायू व धूळ प्रदूषण होत असल्याबाबत स्थानिक ग्रामस्थांकडून मंडळास तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. तथापि, ग्रामस्थांनी माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान आंदोलने केल्याची बाब निदर्शनास आली नाही.

(२) हे खरे आहे.

(३) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत संबंधित उद्योगांची वेळोवेळी पाहणी करण्यात आली आहे. मंडळाने मे. अदानी सिमेंट लिमिटेड (पूर्वाश्रमी अंबुजा (पेन्ना) सिमेंट लिमिटेड) दिनांक ०७/११/२०२५ रोजी प्रस्तावित आदेश बजाविले होते.

तसेच, वातावरणीय हवेच्या गुणवत्तेच्या तपासणीत मे. श्री सिमेंट लिमिटेड (महाराष्ट्र सिमेंट लिमिटेड) व मे. अदानी सिमेंट लिमिटेड (पूर्वाश्रमी अंबुजा सिमेंट लिमिटेड) यांच्या प्रकल्पांमुळे पीएम-१० व पीएम-२.५ चे प्रमाण राष्ट्रीय वातावरणीय हवेच्या गुणवत्ता मानकांपेक्षा जास्त आढळून आल्याच्या अनुषंगाने सदर दोन्हीही उद्योगांची दिनांक १२/०६/२०२६ रोजी उद्योगाची सुनावणी घेण्यात आली असून उद्योगास दिनांक १५/०६/२०२६ रोजी बँक हमी जप्तीच्या अटीसह अंतरिम आदेश (Interim Directions) बजाविण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील अनुदानित दिव्यांग शाळा, वसतिगृहे व पुनर्वसन केंद्रांच्या नुतनीकरणाचे प्रस्ताव प्रलंबित असल्याबाबत

**(४) * ९५२४ श्री.सुधाकर अडबाले, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्रीमती उमा खापरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **दिव्यांग कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनुदानित दिव्यांग शाळा, वसतिगृहे व पुनर्वसन केंद्रांच्या नुतनीकरणासाठी सादर करण्यात आलेले सुमारे १५० प्रस्ताव गत तीन महिन्यांपासून दिव्यांग कल्याण आयुक्तालयाकडे प्रलंबित असल्याने संबंधित संस्थांमधील सुमारे ३ हजार कर्मचाऱ्यांचे वेतन प्रलंबित असल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित शाळा, वसतिगृहे व पुनर्वसन केंद्रांनी नुतनीकरण प्रक्रिया ऑनलाईन प्रणालीद्वारे वेळेत पूर्ण करूनही प्रशासकीय मंजुरी अभावी दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शिक्षण, पुनर्वसन व मूलभूत सुविधांवर प्रतिकूल परिणाम होत असून, शासनाने ऑनलाईन प्रणाली कार्यान्वित केलेली असतानाही प्रस्ताव हेतुपुरस्सर ऑफलाईन पध्दतीने मागविण्याचे प्रकार आयुक्तालयामार्फत सुरु असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने उक्त प्रस्तावाच्या नुतनीकरण मंजुरी प्रक्रियेमध्ये विद्यार्थीसंख्येनुसार आर्थिक मागणी केलेल्या तक्रारींच्या अनुषंगाने कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत व नुतनीकरण प्रक्रिया पूर्ण करून कर्मचाऱ्यांचे प्रलंबित वेतन तातडीने अदा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे :** (१) हे अंशत: खरे आहे.

दिव्यांग क्षेत्रात कार्य करणाऱ्या संस्थांना नवीन नोंदणी प्रमाणपत्र हे शासनाच्या ई-ऑफीस प्रणालीद्वारे व शासन निर्णय दिनांक २८/०९/२०१६ अन्वये शासनाच्या आपले सरकार पोर्टलद्वारे नोंदणी प्रमाणपत्राचे नुतनीकरण देण्यात येत होते.

दिव्यांग क्षेत्रातील संस्थांच्या नोंदणी व नुतनीकरणासाठी शासनाने ‘‘महाराष्ट्र दिव्यांग सहाय्यक पोर्टल’’ विकसित केले असून त्याद्वारे ऑनलाइन अर्ज स्वीकारले जात आहेत. पोर्टलमध्ये काही तांत्रिक अडचणी आढळल्याने त्याबाबत सुधारणा करण्याची कार्यवाही सुरु आहे. पोर्टल पूर्ण क्षमतेने कार्यान्वित होईपर्यंत ई-ऑफीस प्रणालीद्वारे नूतनीकरण प्रस्तावांवर निर्णय घेण्यात येत आहेत.

सद्य:स्थितीत २७९ नुतनीकरण प्रस्तावापैकी २४९ इतके नूतनीकरण प्रकरणे निकाली काढण्यात आली असून उर्वरित ३० नूतनीकरण प्रकरणे व जिल्हा समितीकडून प्राप्त होणारी प्रकरणे तातडीने निकाली काढण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच अनुदानित दिव्यांग उपक्रमांतील मान्यताप्राप्त कर्मचाऱ्यांचे वेतन जून, २०२६ पर्यंत अदा करण्याबाबत सर्व जिल्हा कार्यालयांना निर्देश देण्यात आले आहेत.

(२) हे खरे नाही.

‘‘महाराष्ट्र दिव्यांग सहाय्यक पोर्टल’’ मधील तांत्रिक अडचणी येत असल्याने सदर त्रुटी दूर होईपर्यंत ऑफलाईन पध्दतीने नूतनीकरण देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

(३) सदरहू नोंदणी व नुतनीकरण मंजूरी प्रक्रियेमध्ये आर्थिक मागणीबाबत कोणत्याही कर्मचाऱ्याविरुध्द तक्रार आयुक्तालयास प्राप्त नाही.

सद्य:स्थितीत २७९ नुतनीकरण प्रस्तावापैकी २४९ इतके नूतनीकरण प्रकरणे निकाली काढण्यात आली असून उर्वरित ३० नूतनीकरण प्रकरणे व जिल्हा समितीकडून प्राप्त होणारी प्रकरणे तातडीने निकाली काढण्याची प्रक्रिया सुरु आहे. तसेच अनुदानित दिव्यांग उपक्रमांतील मान्यताप्राप्त कर्मचाऱ्यांचे वेतन जून, २०२६ पर्यंत अदा करण्याबाबत सर्व जिल्हा कार्यालयांना निर्देश देण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई सह ठाणे, नवी मुंबई, रायगड परिसरातील कारखान्यांमुळे प्रदुषणात मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याबाबत

**(५) * ९३८९ श्री.सचिन अहिर, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईसह ठाणे, कल्याण, नवी मुंबई व रायगड परिसरातील कारखान्यांमुळे प्रदूषणात वाढ होत असल्याची गंभीर बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईतील मोठे, मध्यम व लहान अशा एकूण ३४,६९६ कारखान्यांपैकी ३०,६४१ कारखान्यांची प्रदूषण पातळी वाढली असून त्यापैकी ८,५०० कारखान्यांनी अति धोकादायक मानला जाणारा ६० पेक्षा अधिक प्रदूषण निर्देशांक गाठला असून ४,०५५ कारखान्यांचा प्रदूषण निर्देशांक २० पेक्षा कमी आहे, तसेच यामध्ये कल्याण विभागात सर्वाधिक २,६८५ कारखाने प्रदूषणकारक ठरल्याने धोक्याची तीव्रता वाढली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले तसेच लाखो नागरिकांच्या आरोग्याला निर्माण झालेला धोका कमी करण्यासाठी तसेच सदर कारखान्यांमुळे प्रदूषणात होत असलेली वाढ रोखण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने माहे जानेवारी २०२५ ते मे २०२६ पर्यंत केलेल्या कार्यवाहीचा तपशील खालीलप्रमाणे आहे:-

१) मुंबई- कारणे दाखवा नोटीस-१२, प्रस्तावित आदेश-२१७, अंतरिम निर्देश-२०९, उत्पादन बंदचे आदेश-७१

२)ठाणे- कारणे दाखवा नोटीस-२१६, प्रस्तावित आदेश-१५७, अंतरिम निर्देश-१३३, उत्पादन बंदचे आदेश-७७.

३) नवी मुंबई- प्रस्तावित आदेश-११२, अंतरिम निर्देश-१२९, उत्पादन बंदचे आदेश-३८.

४) कल्याण- कारणे दाखवा नोटीस-२३६, प्रस्तावित आदेश-३३३, अंतरिम निर्देश-१७९, उत्पादन बंदचे आदेश-१११.

५) रायगड- कारणे दाखवा नोटीस-११६, प्रस्तावित आदेश-२७९, अंतरिम निर्देश-९४, उत्पादन बंदचे आदेश-४५.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्रातील जलप्रदूषण रोखण्यासाठी प्रभावी उपाययोजना करण्याबाबत

**(६) * ९२८५ ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्रीमती उमा खापरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, श्रीमती चित्रा वाघ, श्री.विक्रांत पाटील, श्री.अमित गोरखे :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्रातील नद्या, तलाव, भूजल स्रोत तसेच किनारी भागांमध्ये वाढत्या जलप्रदूषणामुळे पर्यावरण, सार्वजनिक आरोग्य व जैवविविधतेवर गंभीर परिणाम होत असून, राज्यातील सुमारे ४९ टक्के सांडपाणी प्रक्रिया न होता थेट नदी, नाले व इतर जलस्रोतांमध्ये मिसळत असल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, औद्योगिक सांडपाणी, स्थानिक स्वराज्य संस्थांकडून सोडले जाणारे अपुरे प्रक्रिया केलेले सांडपाणी तसेच शेतीमधून वाहून जाणारी रासायनिक खते व कीटकनाशके हे राज्यातील जलप्रदूषणाचे प्रमुख स्रोत असल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत राष्ट्रीय जल गुणवत्ता संनियंत्रण कार्यक्रमांतर्गत राज्यातील २७२ केंद्रांवर करण्यात आलेल्या तपासणीत जैव-रासायनिक प्राणवायू मागणी (BOD) व फिकल कॉलिफॉमचे प्रमाण अनेक ठिकाणी चिंताजनक आढळून आले असून त्याबाबतची जिल्हानिहाय किंवा विभागनिहाय स्थिती काय आहे,

(४) असल्यास, वाढत्या जल प्रदूषणामुळे जलजन्य रोगांचे प्रमाण वाढणे, भूजलाच्या गुणवत्तेत घट होणे, शेतीयोग्य जमिनीची सुपीकता कमी होणे तसेच नद्या, तलाव व किनारी परिसंस्थांवर प्रतिकूल परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, राज्यातील नदी, तलाव, नाले, भूजल स्रोत व समुद्रकिनारी क्षेत्रांमधील जलप्रदूषण रोखण्यासाठी तसेच सांडपाण्यावर १०० टक्के प्रक्रिया सुनिश्चित करण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या आहेत तसेच विशेषतः सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पांची क्षमता वाढविणे, विद्यमान प्रकल्प अधिक कार्यक्षम करणे, औद्योगिक सांडपाण्यावर कठोर नियंत्रण ठेवणे, स्थानिक स्वराज्य संस्थांची जबाबदारी निश्चित करणे व जनजागृती कार्यक्रम राबविणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

(३) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून प्राप्त अहवालानुसार मुळा-मुठा, इंद्रायणी, पवना, भीमा, मिठी, काळू या सारख्या मुख्य नद्यांच्या पृथ:करण अहवालानुसार, बीओडी व फिकल कॉलिफॉमचे प्रमाण मुख्यत्वे:करुन विनाप्रक्रिया/ अर्धप्रक्रियाकृत घरगुती सांडपाणी मिसळल्यामुळे होत असल्याचे निदर्शनास आले आहे. तसेच केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने जाहीर केलेल्या प्रदूषित नदी पट्ट्याच्या यादीत मुंबई येथील मिठी व कल्याण येथील काळू नदीचा प्राथम्यता क्र.१ मध्ये समावेश होतो. तसेच पुणे जिल्ह्यातील ५ नद्यांचा प्राथम्यता क्रमांक २ मध्ये समावेश होतो. सदर सात नद्यांचे प्रदूषण वाढीचे मुख्य कारण विनाप्रक्रिया घरगुती सांडपाणी मिसळणे हे आहे.

(४) हे अंशत: खरे आहे.

(५) • राज्यातील सर्व जल प्रदूषणकारी उद्योगांनी प्राथमिक/ द्वितीय/ तृतीय स्वरूपाची सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा बसविलेली आहे. उद्योगांनी सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा बसविल्याची खात्री केल्यानंतरच संबंधित उद्योग सुरू करण्याकरीता महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत संमतीपत्र देण्यात येते. तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत प्रदूषणकारी उद्योगांना वेळोवेळी भेटी देऊन त्यांच्या सांडपाण्याची गुणवत्ता तपासली जाते व प्रदूषणाचे प्रमाण मानकांपेक्षा जास्त आढळल्यास दोषी उद्योगांवर जल (प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण) कायदा, १९७४ नुसार कारवाई करण्यात येते.

• उद्योगातून निर्माण होणाऱ्या औद्योगिक सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी राज्यात २६ सामायिक सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा (सी.ई.टी.पी.) उभारण्यात आल्या असून त्याद्वारे एकूण २२३.८५ दशलक्ष लिटर प्रतिदिन इतक्या औद्योगिक सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यात येते.

• राज्यातील ४२३ स्थानिक स्वराज्य संस्था व ७ कटक मंडळामधून एकूण ९,२७०.८ दशलक्ष लिटर प्रतिदिन इतक्या सांडपाण्याची निर्मिती होत असून सद्य:स्थितीत त्यापैकी ५,०२३.८५ दशलक्ष लिटर प्रतिदिन इतक्या सांडपाण्यावर प्रक्रिया केली जाते. उर्वरित ४,२४६.९५ दशलक्ष लिटर प्रतिदिन इतक्या घरगुती सांडपाण्यावर प्रक्रिया करण्याकरीता ५,६५० दशलक्ष लिटर प्रतिदिन इतक्या क्षमतेच्या सांडपाणी प्रक्रिया केंद्रांचे काम सुरू आहे.

• राज्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांना सांडपाणी व्यवस्थापन व घनकचरा व्यवस्थापनासाठी भांडवली खर्चातून २५ टक्के रक्कम राखीव ठेवून याच कारणासाठी वापरणे बंधनकारक करण्यात आले आहे. तसेच सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा उभारून अद्ययावत करण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत सन २०२४ ते सन २०२६ या कालावधीत एकूण ४७ स्थानिक स्वराज्य संस्थांना कारणे दाखवा नोटीस, ७६ स्थानिक स्वराज्य संस्थांना प्रस्तावित निर्देश व १९ स्थानिक स्वराज्य संस्थांना अंतरिम निर्देश बजावण्यात आले आहेत.

• राज्यातील नद्यांचे प्रदूषण कमी करण्यासाठी आणि नदी संवर्धन/ पुनरुज्जीवन करण्यास्तव नियामक आणि विकासात्मक दोन्ही कार्ये एकत्रित करण्यासाठी पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग शासन निर्णय क्र.नमुप्रा-२०२५/प्र.क्र.३२/तां.क.३, दिनांक २७/०४/२०२६ अन्वये मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र राज्य नदी पुनरुज्जीवन प्राधिकरणाची स्थापना करण्यात आली आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील शासकीय फ्लेक्स व होर्डिंग्जना कमी दराने भाडे आकारण्यात येत असल्याबाबत

**(७)** * **८६६४ श्री.कृपाल तुमाने :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील माहिती व जनसंपर्क महासंचालनालय यांच्याकडील शासकीय मालकीच्या फ्लेक्स व होर्डिंग्ज यांना कमी दरात भाडे आकारण्यात येत असून, खाजगी संस्था अथवा व्यक्तीच्या माध्यमातून लावल्या जाणाऱ्या फ्लेक्स व होर्डिंगजकरिता उच्च दराने भाडे आकारण्यात येत असल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी खाजगी संस्था व व्यक्तीमार्फत मोठ्या प्रमाणावर अवैधरित्या फ्लेक्स व होर्डिंग्स शासकीय जागावर लावण्यात येत असून त्यावर माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे कोणत्याही प्रकारे नियंत्रण नसल्याने शासनाच्या कोट्यवधी रुपयाचे नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर अवैधरित्या उभारण्यात येणारे होर्डिंग्ज व फ्लेक्सवर नियंत्रण आणण्यासाठी तसेच शासकीय मालकीच्या होर्डिंग्ज व फ्लेक्सचे डिजिटल रूपांतरण करून अधिक प्रभावीपणे वापर करण्याबाबत व महसूल वाढविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

माहिती व जनसंपर्क महासंचालनालयद्वारे त्यांच्या अधिनस्त असलेल्या (शासकीय मालकीच्या) फ्लेक्स व होर्डिंग बाबत कोणत्याही प्रकारचे भाडे आकारले जात नाही. खाजगी संस्था/व्यक्तीमार्फत लावल्या जाणाऱ्या फ्लेक्स व होर्डिंगजवर माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे कोणतेही नियंत्रण नाही.

(२) हे खरे नाही.

खाजगी संस्था व व्यक्तीमार्फत मोठया प्रमाणावर फ्लेक्स व होर्डिंग शासकीय जागेवर लावण्याचा परवाना देण्याची बाब माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या कार्यकक्षेत येत नाही.

नगर विकास विभागांतर्गत, बृहन्मुंबई महानगरपालिका (आकाशचिन्ह व जाहिराती प्रदर्शित करण्याचे नियमन आणि नियंत्रण) मार्गदर्शक तत्वे, २०२२ दि.२९.०४.२०२२ रोजीच्या अधिसूचनेन्वये निर्गमित करण्यात आले आहे. राज्यातील सर्व महानगरपालिकांकरीता (बृहन्मुंबई वगळून) होर्डिंग, जाहिरात फलक, बॅनर इत्यादीबाबत जाहिरात नियमावली २०२२ दि.९.०५.२०२२ अन्वये जाहिरात परवान्यांकरीता शुल्क आकारण्याबाबत नियम करण्यात आलेले आहेत. तथापि, होर्डिंग्जकरीता संबंधित महानगरपालिका/नगरपालिकांकडून त्यांच्यास्तरावर विहीत केलेल्या कार्यपद्धतीनुसार शुल्क आकारणी करण्यात येते.

दि.१४.३.२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये अनधिकृत जाहिराती, घोषणा फलक, होर्डिग्ज, पोस्टर्स या संदर्भात मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार अपर मुख्य सचिव (गृह) यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेली समिती अनधिकृत होर्डिंगबाबत वेळोवेळी आढावा घेते.

(३) शासनाच्या लोकोपयोगी योजनांची माहिती अधिक प्रभावीपणे तळागाळापर्यंत पोहोचविण्याच्या अनुषंगाने राज्यातील मोक्याच्या ठिकाणी असलेल्या शासकीय कार्यालये व इमारतींवर LED होर्डिंग उभारणीबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेकरीता शालेय बसेस व व्हॅनमध्ये सीसीटीव्हीसह अन्य यंत्रणा बसविण्याबाबत

**(८) * ९५५३ श्रीमती भावना गवळी :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी सर्वोच्च प्राधान्य देत प्रत्येक शालेय बस व व्हॅनमध्ये सीसीटीव्ही, डिजिटल सुरक्षा निरीक्षण प्रणाली, पॅनिक बटण तसेच लाईव्ह ट्रॅकिंग प्रणाली बंधनकारक करण्याचा निर्णय शासनाने घेतला असल्याचे माहे मे, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बदलापूर येथील घटनेच्या पार्श्वभूमीवर शासनाने स्थापन केलेल्या समितीच्या अहवालानुसार विद्यार्थ्यांच्या सुरक्षित वाहतुक सेवेसाठी सुधारित नियमावली तयार करण्यात आली असून येत्या शैक्षणिक सत्रापासून उक्त नियमावली लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नव्या नियमांनुसार शालेय बसमध्ये महिला परिचारिका/सहाय्यक नियुक्त करणे, विद्यार्थ्यांची दैनंदिन उपस्थिती व प्रवास नोंद ठेवणे, चालक व वाहकांची पोलीस पडताळणी, वैद्यकीय फिटनेस प्रमाणपत्र व चारित्र्य पडताळणी सक्ती करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर नियमांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी शिक्षण विभाग व परिवहन विभागामार्फत संयुक्त तपासणी पथके अथवा विशेष निरीक्षण यंत्रणा कार्यरत करण्याबाबत तसेच नियमांचे उल्लंघन करणाऱ्या शालेय बस, व्हॅन अथवा संबंधित संस्थांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रताप सरनाईक :** (१) शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षित वाहतूकीकरीता दिनांक ०८/०४/२०२६ रोजीच्या अधिसूचनेद्वारे प्रारुप नियमावली प्रसिध्द करण्यात आली आहे. त्यामध्ये विद्यार्थी वाहतूक करणाऱ्या सर्व वाहनांमध्ये सीसीटीव्ही बसविणेबाबत तरतूद करण्यात आली आहे. तसेच केंद्रिय मोटार वाहन नियम, १९८९ च्या नियम १२५ एच नुसार परिवहन संवर्गातील वाहनांना Vehicle Location Tracking Device (VLTD) बसविणे अनिवार्य करण्यात आले आहे.

(२) व (३) बदलापूर येथील घटनेच्या पार्श्वभूमीवर शालेय शिक्षण विभाग व महिला बालविकास विभागातील अधिकाऱ्यांची समिती गठित केली आहे. सदर समितीने विद्यार्थी वाहतूक करणाऱ्या वाहनांमध्ये सीसीटीव्ही, महिला कर्मचारी व ड्रायव्हर, कंडक्टर, क्लीनर इत्यादीची पोलीस पडताळणी आवश्यक असल्याची शिफारस केली आहे.

शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षित वाहतूकीकरीता सुधारीत नियमावलीचे प्रारुप नियम दिनांक ०८/०४/२०२६ रोजीच्या अधिसूचनेद्वारे प्रसिध्द केले आहेत. सदर नियमामध्ये वाहन चालक, कंडक्टर, सहवर्ती यांची चारित्र्य पडताळणीबाबत तरतूद आहे. तसेच विद्यार्थीनी वाहतूक करणाऱ्या स्कूल व्हॅन वगळून प्रत्येक स्कूल बसमध्ये सहवर्तीची तरतूद करण्यात आलेली आहे.

(४) दिनांक ०१/०४/२०२५ ते दिनांक ३१/०३/२०२६ या कालावधीत विद्यार्थ्यांची विनापरवाना वाहतूक करणाऱ्या ८,३३३ इतक्या वाहनांवर परिवहन विभागाकडून कारवाई करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सावदा (जि.जळगाव) पोलीस ठाण्यात बनावट गुन्हा दाखल केल्याबाबत

**(९) * ९४०१ श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सावदा (जि.जळगाव) येथील पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सावदा-फैजपूर रस्त्यावरील एमआयडीसी परिसरात दिनांक २७ ऑगस्ट २०२५ रोजी पोलीस व गुन्हेगारांच्या संगनमताने एक बनावट गुन्हा सावदा पोलीस ठाण्यात नोंदविण्यात आला असून, या प्रकरणातील दोषी पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांची उच्चस्तरीय चौकशी करण्यासाठी मा.लोकप्रतिनिधींनी दिनांक ५ फेब्रुवारी २०२६ आणि दिनांक १७ फेब्रुवारी २०२६ रोजी विशेष पोलीस महानिरीक्षक, नाशिक परिक्षेत्र यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे मागणी केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय निष्कर्ष आढळून आले तसेच चौकशीच्या अनुषंगाने पदाचा दुरुपयोग करणाऱ्या व शासकीय नियमांचे उल्लंघन करणाऱ्या दोषी पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) मा.लोकप्रतिनिधी श्री.एकनाथराव गणपतराव खडसे, मा.विधानपरिषद सदस्य यांनी विशेष पोलीस महानिरीक्षक, नाशिक परिक्षेत्र यांच्याकडे लेखी निवेदन दिले आहे. सदरच्या निवेदनात असे नमुद करण्यात आले आहे की, सावदा, जि.जळगाव येथील पोलीस स्टेशनच्या हद्दीतील सावदा-फैजपुर रोडवर एमआयडीसी परिसरात दिनांक २७/०८/२०२५ रोजी पोलीस व गुन्हेगारांच्या संगणमताने बनावट पोलीस केस नोंदविण्यात आली असून या प्रकरणातील दोषी पोलीस कर्मचाऱ्यांची उच्चस्तरीय चौकशी करण्यात यावी व संबंधितांवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी.

(२) सदरच्या निवेदनाच्या अनुषंगाने उपविभागीय पोलीस अधिकारी, भुसावळ यांच्यामार्फत चौकशी करण्यात आली असून चौकशीत निष्पन्न झाले की, दिनांक २७/०८/२०२५ रोजी सदर गुन्ह्यातील फिर्यादी हे त्यांच्या मित्रासोबत निंभोरा, ता.रावेर येथुन व्यापाराचे पैसे रुपये १,५०,०००/- इतकी रक्कम घेवुन भुसावळ कडे जात असताना आरोपींनी त्यांचा रस्ता अडवुन पिस्टलचा धाक दाखवुन फिर्यादी यांच्याकडील सर्व रक्कम बळजबरीने काढुन घेतली. सदरच्या घटनेबाबत फिर्यादी यांच्या फिर्यादी जबाबावरुन पोलीस स्टेशन, सावदा येथे गु.र.नं. २११/२०२५, भा.न्या.सं. कलम ३१०(२), ११५(२), ३५१(२), ३५१(३), ३५२, सह शस्त्र अधिनियम कलम ३/२५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरच्या गुन्ह्यातील ५ आरोपींपैकी ४ आरोपींना अटक करण्यात आली असून उर्वरित एका आरोपीचा शोध सुरु असून निष्पन्न आरोपींविरुध्द मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. तसेच आरोपींनी फिर्यादी यांच्याकडुन बळजबरीने काढुन घेतलेली रुपये १,५०,०००/- रक्कम मा.न्यायालयाच्या आदेशाने फिर्यादीस परत करण्यात आली आहे.

तसेच गुन्ह्यातील आरोपींची ओळख परेड ही अपर जिल्हा दंडाधिकारी, जळगाव या स्वतंत्र यंत्रणेकडुन करण्यात आली असून त्यामध्ये पोलीसांचा कोणताही सहभाग नसल्याचे दिसुन आले आहे. यावरुन पोलीस व गुन्हेगारांच्या संगनमताने सदरचा गुन्हा बनावट नोंदविल्याची बाब निदर्शनास आलेली नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## तळोजा (ता.पनवेल, जि.रायगड) परिसरातील शेतजमिनीमध्ये घातक रासायनिक कचरा बेकायदेशीररीत्या टाकण्यात येत असल्याबाबत

**(१०) * ९३४५ श्री.विक्रांत पाटील :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तळोजा (ता.पनवेल, जि.रायगड) परिसरातील शेतजमिनीमध्ये धोकादायक रासायनिक कचरा बेकायदेशीररीत्या टाकला जात असल्याची बाब माहे एप्रिल,२०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रासायनिक कचऱ्यामुळे जमिनीची सुपीकता, पिकांचे उत्पादन तसेच स्थानिक नागरिकांच्या आरोग्यावर प्रतिकूल परिणाम होत असल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणाची चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व संबंधित उद्योग घटकांविरुध्द महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ व इतर संबंधित प्राधिकरणांकडून कोणती कायदेशीर कारवाई करण्यात आली तसेच भविष्यात धोकादायक रासायनिक कचऱ्याची बेकायदेशीररित्या विल्हेवाट रोखण्यासाठी शासनाने कोणती प्रतिबंधात्मक उपाययोजना केली वा करण्यात येत आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) अंशत: खरे आहे.

(२) तालुका कृषी अधिकारी, पनवेल यांचेकडून अशी कोणतीही तक्रार प्राप्त नसलेबाबत अहवाल प्राप्त झाला आहे. तथापि, याबाबत जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, रायगड यांना जमिनीची सुपिकता व पिकांचे उत्पादन याबाबतच्या परिणामाबाबत आवश्यक तपासणी करुन अहवाल सादर करणेबाबत सूचना देण्यात येत आहेत.

वैद्यकीय आरोग्य अधिकारी, पनवेल महानगरपालिका यांनी पनवेल महानगरपालिका क्षेत्रामध्ये माहे जानेवारी, २०२६ ते माहे मे, २०२६ या कालावधीमध्ये उपचारार्थ आलेल्या रुग्णांचा तपशीलावरून सदर आजारांची कारणे ही संसर्गजन्य, वातावरणीय बदल व प्रदूषण इत्यादी असू शकतात याबाबत अहवाल सादर केला आहे.

(३) तळोजा शेजारील पडघे, ता.पनवेल गावाच्या हद्दीत बेकायदेशीररीत्या घातक घनकचरा टाकल्याबाबत प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने केलेल्या स्थानिक पाहणीअंती महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून ऑगस्ट, २०२५ मध्ये प्रथम खबर अहवाल नोंदविण्यात आला आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून जवळच्या सामायिक घातक कचरा प्रक्रिया विल्हेवाट यंत्रणेमार्फत सदरील घातक घनकचरा उचलून त्याची शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट लावण्यात आली आहे.

तसेच मौजे-धानसर तालुका पनवेल गावच्या हद्दीमध्ये घातक घनकचरा टाकल्याचे आढळल्याने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ व पोलिसांच्या संयुक्त स्थळपाहणी नंतर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून मार्च, २०२६ मध्ये प्रथम खबर अहवाल तळोजा पोलीस स्थानक येथे नोंदविण्यात आला असून पोलीस विभागाकडून याबाबत तपासाची पुढील कार्यवाही सुरु आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून जवळच्या सामायिक घातक कचरा प्रक्रिया विल्हेवाट यंत्रणेमार्फत सदरील घातक घनकचऱ्याची विल्हेवाट लावण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

सदरील प्रकारचा घातक घनकचरा बेकायदेशीररीत्या टाकण्यात येऊ नये, याकरीता महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत पोलीस विभागास रात्रीच्या वेळेस विशेष पथकामार्फत गस्त घालण्याबाबत विनंती करण्यात आली आहे. परिसरातील स्थानिक स्वराज्य संस्था यांना सुध्दा सतर्क राहण्याच्या सूचना महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत देण्यात आलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नागपूर येथील दोसर भवन चौकामध्ये स्फोटके आढळल्याबाबत

**(११)** * **८७५७ श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील सेंट्रल एव्हेन्यूवरील दोसर भवन चौकामध्ये एका बेवारस बॅगेमध्ये ५० डिटोनेटर, १५ जिलेटिन कांड्या आणि ८ कनेक्टर यांसारखे स्फोटक साहित्य आढळून आल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागपूर शहरासारख्या गजबजलेल्या आणि गर्दीच्या परिसरात इतक्या मोठ्या प्रमाणात स्फोटके आढळल्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, सदर प्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे काय व या प्रकरणाच्या तपासासाठी दहशतवाद विरोधी पथक (ATS) किंवा विशेष पथकाची नियुक्ती करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने भविष्यात अशा प्रकारच्या घटनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी तसेच सार्वजनिक ठिकाणांच्या

सुरक्षेसाठी नागपूर शहरात सीसीटीव्ही जाळे विस्तारणे, बॉम्ब शोधक व नाशक पथकाची गस्त वाढविण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) पोलीस आयुक्तालय, नागपूर शहर अंतर्गत पोलीस ठाणे, गणेशपेठ यांच्या हद्दीतील दोसर भवन परिसरात दिनांक ०७/०४/२०२६ रोजी संशयास्पद वस्तू बाबत डायल ११२ वरून फिर्यादिमार्फत पोलीसांना माहिती प्राप्त झाली. त्यानंतर पोलीसांनी तात्काळ घटनास्थळी जावून पाहणी केली असता संशयास्पद वस्तू दिसून आल्याने बि.डी.डी.एस. पथक तसेच न्यायवैज्ञानिक प्रयोगशाळा पथक यांच्या मदतीने घटनास्थळाची पाहणी केली.

घटनास्थळावर खालीलप्रमाणे वस्तू आढळून आल्या आहेत.

- NEOGEL ९०१ EMUSLSION EXPOLSIVE १२५ g SBL Energy Limited १५ नग
- लाल रंगाची क्लिप लागलेले डिटोनेटर ०८ नग
- खुले डिटोनेटर ५० नग

(२) सदर प्रकरणी पोलीस ठाणे गणेशपेठ येथे अप.कमांक १०४/२६ कलम २८८ भा.न्या.स. सहकलम ४, ५, स्पोटक पदार्थ अधिकानियम १९०८ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून प्रकरणाचा तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पोलीस ठाणे, गणेशपेठ हे करीत आहे. तसेच सुरक्षेच्या अनुषंगाने पोलीस विभागामार्फत नियमित गस्त घालण्यात येते.
(३) सदर गुन्हयाचा तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पोलीस ठाणे, गणेशपेठ हे करीत असून चौकशीच्या अनुषंगाने भविष्यात अशा प्रकारच्या घटनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी सी.ओ.सी यांना पत्रव्यवहार करण्यात आला असून जास्तीत जास्त सार्वजनिक परिसरात सी.सी.टीव्ही कॅमेरे लावण्यात यावे याबाबत पत्र देण्यात आले आहे तसेच पोलीस ठाणे मध्ये अधिकारी अंलमदार यांचे पथक तयार करून गस्तीचे प्रमाण वाढविण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नसरापूर (ता.भोर, जि.पुणे) येथील बालिकेवरील अत्याचाराच्या घटनेची चौकशी करून कारवाई करण्याबाबत

**(१२) * ९२९८ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अरुण लाड, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नसरापूर (ता.भोर, जि.पुणे) येथे साडेतीन वर्षांच्या अल्पवयीन बालिकेवर अत्याचार करून तिचा निर्घृण खून करण्यात आल्याची अत्यंत गंभीर घटना दिनांक १ मे, २०२६ रोजी घडली असून, यामुळे परिसरात व राज्यात तीव्र संतापाची लाट उसळली असल्याने सदर घटनेच्या निषेधार्थ स्थानिक ग्रामस्थ व सामाजिक संघटनांनी निदर्शने करून आरोपीस कठोर शिक्षा करण्याबाबतची मागणी केली असल्याची बाब माहे मे, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणाच्या सखोल तपासासाठी विशेष तपास पथक (SIT) स्थापन करण्यात आले आहे तसेच आरोपीविरुध्द भारतीय न्याय संहिता व लैंगिक अपराधांपासून बालकांचे संरक्षण अधिनियमातील कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने सदर खटला 'जलदगती न्यायालयात' चालवून आरोपीस फाशीची किंवा कठोर शिक्षा मिळवून देण्यासाठी व राज्यात वाढत्या बाल लैंगिक अत्याचारांच्या घटनांना आळा घालण्यासाठी तसेच अल्पवयीन मुलांच्या सुरक्षिततेसाठी कोणती प्रतिबंधात्मक उपाययोजना केली आहे, तसेच सदर प्रकरणाच्या तपासात किंवा कायदेशीर कार्यवाहीत दिरंगाई करणाऱ्या संबंधित जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) नसरापूर (ता.भोर, जि.पुणे) येथे साडेतीन वर्षांच्या अल्पवयीन बालिकेवर अत्याचार करून तिचा निर्घृण खून केल्याप्रकरणी राजगड पोलीस स्टेशन, पुणे येथे गु.र.नं.१६९/२०२६ नुसार दिनांक ०२/०५/२०२६ रोजी कलम १३७(२), १०३, ६४, ६५(२), ७४, १४०(१), १४०(३) भा.न्या.सं. सह कलम ४, ६, ८, १२ पोक्सो अधिनियमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याच्या तपासाकरीता विशेष तपास पथक गठीत करण्यात आले असून आरोपीला दिनांक ०२/०५/२०२६ रोजी अटक करण्यात येऊन दिनांक १४/०५/२०२६ रोजीपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली होती. सद्य:स्थितीत आरोपी न्यायालयीन कोठडीमध्ये असून आरोपीविरुध्द दिनांक १६/०५/२०२६ रोजी मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

तसेच, सदर प्रकरणाची फास्ट ट्रॅक कोर्टात सुनावणी सुरू असून प्रकरणी विशेष सरकारी अभियोक्ता यांची नेमणूक करण्यात आली आहे.

राज्यात महिला व बालकांवरील अत्याचारांना प्रतिबंध करण्यासाठी पुढीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहेत :-

१) महिला व बालकांवरील अत्याचारांना प्रतिबंध करणे व त्यानुषंगाने इतर अनुषंगिक कारवाई करण्यासाठी अपर पोलीस महासंचालक दर्जाच्या अधिकाऱ्यांच्या नियंत्रणाखाली महिला व बाल अपराध प्रतिबंध विभाग हा स्वतंत्र विभाग कार्यरत करण्यात आला आहे.

२) महिलांविषयीच्या गुन्हयांचा तपास करण्यासाठी सर्व पोलीस घटकांमध्ये पोलीस आयुक्त / पोलीस अधीक्षक यांच्या अधिपत्याखाली स्वतंत्र पोलीस तपास पथकाची स्थापना करण्यात आलेली आहे.

३) महिलांवरील होणाऱ्या अत्याचारांना प्रतिबंध करण्यासाठी राज्यातील सर्व पोलीस घटकांमध्ये एकूण ५१ भरोसा सेलची स्थापना करण्यात आली आहे.

४) पोलीस स्टेशनमध्ये तक्रार घेऊन येणाऱ्या महिलांना सौजन्याची वागणूक देणे, महिलांकडून प्राप्त तक्रारींची विनाविलंब दखल घेणे, पीडित महिला व मुलींच्या तक्रारी हाताळण्यासाठी समाजातील विविध घटकांचे सहकार्य घेणे याकरीता सर्व पोलीस आयुक्तालय / पोलीस अधीक्षक तसेच, पोलीस स्टेशन स्तरावर महिला दक्षता समित्यांची स्थापना करण्यात आली आहे.

५) महिला व मुलीवरील अत्याचारास प्रतिबंध करण्याकरीता पोलीसांमार्फत गस्त घालण्यात येते, यांतर्गत निर्भया, दामिनी, पोलीस काका, पोलीस दीदी व बडी कॉप या उपाययोजना करण्यात येतात. तसेच, या पथकांमार्फत प्रत्यक्ष भेटी देऊन समुपदेशन, मार्गदर्शन व जनजागृती करण्यात येते.

६) महिला हेल्पलाईन क्रमांक १०३ व १०९१, बालकांसाठी हेल्पलाईन क्रमांक १०९८, इमर्जन्सी हेल्पलाईन क्रमांक ११२ कार्यरत असून त्याव्दारे महिलांना व बालकांना २४ x ७ मदत देण्यात येते.

७) महिलांवरील अत्याचाराची प्रकरणे निकाली काढण्याकरीता एकूण ५८ जलदगती न्यायालयांची स्थापना करण्यात आलेली आहे.

८) महिला व बालविकास विभागाच्या वतीने अत्याचार पीडित महिला व बालकांना समुपदेशनाकरीता राज्यात १२४ महिला विशेष समुपदेशन केंद्र कार्यरत आहेत.

९) लैंगिक अत्याचार व ॲसिड हल्ल्यातील पीडित महिला व बालकांना वित्तीय सहाय्य व कायदेशीर मदत देण्यासाठी मनोधैर्य योजना सुरु करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नाशिक जिल्ह्यातील उदवाहनांची तपासणी प्रक्रिया पूर्ण करण्याबाबत

**(१३) * ८६४१ श्री.पंकज भुजबळ, श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक शहरातील ११,५०० उदवाहनांपैकी केवळ ४,५०० उदवाहनांची तपासणी पूर्ण झाली असून, ७,००० उदवाहने तपासणीविना सुरु असल्याने नाशिक जिल्ह्यातील उदवाहन सुरक्षिततेबाबत निष्काळजीपणा होत असल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नाशिक जिल्ह्यातील एका रुग्णालयात उदवाहनाच्या दुर्घटनेत महिला कर्मचाऱ्याचा मृत्यू झाला असून संबंधित दुर्घटनेप्रकरणी जबाबदार अधिकारी/व्यवस्थापन यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, नाशिक जिल्ह्यातील एकूण उदवाहनांपैकी नियमांनुसार तपासणी न झालेल्या सर्व धोकादायक उदवाहनांची तपासणी प्रक्रिया जलद व अधिक कडक करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) उद्वाहनाच्या कामकाजाकरीता यापूर्वी २ विद्युत निरीक्षक (उद्वाहन) व इतर ६९ तांत्रिक पदे मंजूर होती. उद्वाहनांचे वार्षिक निरीक्षण करण्यासाठी जास्तीचे अधिकाधिक मनुष्यबळ उपलब्ध होण्याच्या दृष्टीने शासनाने दिनांक २८/०४/२०२५ रोजीच्या अधिसूचनेद्वारे उद्वाहनविषयक कामकाजाचे विभाग/ जिल्हास्तरावर विकेंद्रीकरण केले आहे.

विद्युत निरीक्षक, नाशिक या कार्यालयातील कार्यरत २ सहायक विद्युत निरीक्षक व १३ सहाय्यक अभियंता श्रेणी-२ / शाखा अभियंतायांच्या मार्फत माहे जून-२०२५ ते मे-२०२६ दरम्यान ४८२५ एवढ्या उद्वाहनांची नियतकालिक वार्षिक निरीक्षणे करण्यात आली आहेत. तसेच उर्वरित उद्वाहनांची वार्षिक निरीक्षणे सुरु आहेत.

(२) डॉ. वसंत पवार मेडिकल कॉलेज हॉस्पिटल व रिसर्च सेंटर आडगाव, नाशिक शहर येथील ओटी कॉप्लेक्स मध्ये विनापरवानगी उभारण्यात आलेल्या ड्रमवेटर सयंत्र (सर्व्हीस हाईस्ट) वर-खाली येत असताना हॉस्पिटलमध्ये कार्यरत असलेल्या श्रीमती ज्योती शिवाजी आहिरे (मदतनीस) या खाली वाकुन पाहत असताना ड्रमवेटर सयंत्राच्या धडकेने त्यांचा दिनांक २८ एप्रिल, २०२५ रोजी दुर्देवी मृत्यू झाल्याची घटना घडलेली आहे.

सदरचे ड्रमवेटर (सर्व्हिस हाईस्ट) जैव-वैद्यकिय कचऱ्यांची विल्हेवाट लावण्याकरीता हॉस्पीटलमध्ये कार्यरत होते. सदर ड्रमवेटर यंत्रणा ही उद्वाहन /लिफ्टच्या परिभाषेत मोडत नसल्याने त्यास उद्वाहन अधिनियमाच्या तरतुदी लागू होत नाही. सबब, याबाबतची तपासणी / निरीक्षण हे विद्युत निरीक्षक, नाशिक यांच्या अखत्यारित येत नाही. तथापि, सदर दुर्घटनेप्रकरणी आडगाव पोलीस स्टेशन, ता.जि.नाशिक येथे गुन्हा नोंद क्र. १६५/२०२६ नुसार प्रथम खबर अहवाल दाखल केला आहे.

(३) शासन अधिसूचना दिनांक २८/०४/२०२५ अन्वये उद्वाहनविषयक कामकाजाचे विभाग/ जिल्हास्तरावर विकेंद्रीकरण करण्यात आले आहे. त्यानुसार विद्युत निरीक्षक, नाशिक या कार्यालयातंर्गत धोकादायक स्थितीत असलेल्या उद्वाहनाची तपासणी/ निरीक्षणे करण्याकरीता परवानाधारक उद्वाहन ठेकेदार यांच्याकरीता उद्वाहनाचे वार्षिक देखभाल व दुरूस्ती सुरक्षिततेच्या दृष्टीने विशेष कार्यशाळेचे आयोजन करून आवश्यक त्या सूचना देण्यात आले आहेत. तसेच विद्युत निरीक्षक, नाशिक कार्यालयातील कार्यरत अभियंत्यामार्फत उर्वरित उद्वाहनांचे नियमितपणे निरीक्षणे सुरू असून, तपासणीदरम्यान उद्वाहनामध्ये आढळून आलेल्या त्रुटी/ दोष लेखी स्वरूपात संबंधित मालक/ वापरकर्ते यांना कळविले आहे. वार्षिक निरीक्षणे करण्याच्या अनुषंगाने प्रति अभियंत्यास मासिक उद्दिष्टे देण्यात आले असून त्यानुसार निरीक्षणे करण्याचे आदेशित केले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यामध्ये नंबर प्लेट नसलेल्या वेगवान वाहनांमुळे अपघातांमध्ये वाढ झाल्याबाबत

**(१४)** * **९८११ श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातून जाणारा धुळे - सोलापूर राष्ट्रीय महामार्ग, जालना मार्ग आणि हरसूल-सावंगी मार्गावर नंबर प्लेट नसलेल्या वेगवान 'हायवा टिप्पर' या वाहनांमुळे मोठ्या प्रमाणात अपघात होऊन मृत्यूंच्या संख्येत वाढ होत असल्याची बाब माहे मे, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी स्थानिक नागरिकांनी वारंवार तक्रारी करूनही संबंधित पोलीस प्रशासन आणि प्रादेशिक परिवहन कार्यालय यांच्याकडून अशा नंबर प्लेट नसलेल्या व वेगवान धावणाऱ्या धोकादायक हायवा टिप्पर वाहनांवर कोणतीही कारवाई केली जात नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर अवैधरित्या वाहतूक करणाऱ्या वाहन मालकांनी शासकीय अधिकाऱ्यांच्या व पोलिसांच्या हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी महामार्गांवर खबऱ्यांची (Watchers) विशेष पथके तैनात केली असून, कारवाईची पूर्वकल्पना मिळाल्याने वाहनचालक सतर्क होत असल्यामुळे पोलिसांना त्यांच्यावर कारवाई करणे अडचणीचे होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, संबंधित पोलीस विभाग व प्रादेशिक परिवहन कार्यालयाने सदर प्रकरणाची दखल घेऊन अवैध वाहतूक व विना नंबर प्लेट वाहनांना तात्काळ प्रतिबंध करण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रताप सरनाईक :** (१) नाही.

(२), (३) व (४) प्रादेशिक परिवहन कार्यालयातील वायुवेग पथकांमार्फत आणि वाहतूक पोलीस विभागाकडून वाहतूक नियम विषयक गुन्ह्यांसाठी नियमित तपासणी व कारवाई केली जाते.

प्रादेशिक परिवहन कार्यालय, छत्रपती संभाजीनगर येथील वायुवेग पथकांमार्फत दिनांक ०१/०४/२०२५ ते दिनांक ३१/०५/२०२६ पर्यंत विना नंबर प्लेट असलेल्या ९२० वाहनांवर कारवाई करण्यात आली असून एकूण रुपये ११.२४ लक्ष इतका दंड वसुल करण्यात आला आहे.

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात माहे जानेवारी, २०२५ ते एप्रिल, २०२५ या कालावधीपेक्षा माहे जानेवारी, २०२६ ते एप्रिल, २०२६ या कालावधीत रस्ते अपघातामधील मृत्यूंच्या संख्येत ३ टक्क्यांनी घट झाली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील व्यावसायिक प्रवासी वाहन चालकांसाठी मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक असण्याकरीता ‘महाराष्ट्र मोटार वाहन नियमात’ सुधारणा करण्याबाबत

**(१५) * ९८३१ श्री.किशोर दराडे, श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सदाशिव खोत, श्री.अमित गोरखे :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेत (उदा. रिक्षा, टॅक्सी, बस इत्यादी) प्रवाशांशी सुसंवाद साधण्यासाठी आणि प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी वाहन चालकांना मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक असल्याबाबत शासनाकडे मागणी प्राप्त झाल्या असून, यानुषंगाने राज्य शासनाने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलत ‘महाराष्ट्र मोटार वाहन नियम, १९८९’ मधील नियम ४, ७८ आणि ८५ मध्ये आवश्यक सुधारणा करण्याचा प्रस्ताव तयार केला असल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्याच्या परिवहन आयुक्तांनी याबाबतचा सुधारित प्रस्ताव गृह (परिवहन) विभागाकडे सादर केला असून, त्यानुसार मसुदा अधिसूचना काढण्याची प्रक्रिया सध्या अंतिम टप्प्यात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नवीन नियमावलीनुसार राज्यात व्यावसायिक प्रवासी वाहन चालविण्याचा परवाना मिळविण्यासाठी अर्जदाराला मराठी भाषेचे व्यावहारिक ज्ञान असणे बंधनकारक केले जाणार आहे काय तसेच ज्या वाहन चालकांना मराठी भाषा अवगत नाही, त्यांना ती आत्मसात करण्यासाठी काही निश्चित कालावधी दिला जाणार आहे काय,
(४) असल्यास, सदर नियमांचे उल्लंघन करून मराठी भाषेचे ज्ञान नसतानाही अनधिकृतपणे व्यावसायिक वाहन चालविणाऱ्या चालकांवर मोटार वाहन कायद्यांतर्गत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रताप सरनाईक :** (१) होय.
(२), (३) व (४) राज्यातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेत रिक्षा, टॅक्सी, बस मधील प्रवाशांशी सुसंवाद साधण्यासाठी आणि प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी वाहन चालकांना मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक असल्याबाबत शासनाकडे मागण्या प्राप्त झाल्या आहेत. या अनुषंगाने राज्याने एक महत्वपूर्ण पाऊल उचलत "महाराष्ट्र मोटार वाहन नियम,१९८९ मधील नियम ४, २२, २४, ७८ आणि ८५ मध्ये आवश्यक सुधारणा करण्याबाबत प्रस्तावित आहे. सार्वजनिक प्रवासी वाहन चालविणाऱ्या वाहन चालक / परवानाधारकांसाठी मराठी भाषेचे व्यवहारिक ज्ञान (working knowledge) आवश्यक असणेबाबतची सुधारणा करण्याची बाब कार्यवाहीखाली सुरु आहे.राज्यातील ऑटोरिक्षा/ टॅक्सी चालकांसाठी महाराष्ट्र माझा, मराठी माझी संवाद भाषा हा प्रशिक्षण उपक्रम राज्य मराठी विकास संस्था, कोकण मराठी साहित्य परिषद व मुंबई मराठी साहित्य संघ व परिवहन विभाग यांच्या संयुक्त विद्यमानाने दिनांक ०१/०६/२०२६ ते दिनांक १५/०८/२०२६ या कालावधीत राबविण्यात येत आहे.सदर उपक्रम राबविण्यासाठी प्रत्येक कार्यालयातील सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी यांची नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली असून, कार्यालयातील मोटार वाहन निरीक्षक यांचेमार्फत देखील सदर कालावधीमध्ये व्यावहारीक मराठी भाषा शिकवणी वर्गाचे आयोजन करण्यात येत आहे.मराठी भाषेचे ज्ञान नसतानाही व्यावसायिक वाहन चालवणाऱ्या चालकांच्या प्राधिकारपत्रावर कारवाई करण्यासाठी विभागाकडून नियम अंतिम करण्याची बाब कार्यवाहीखाली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील वाहनांची परराज्यात नोंदणी करून करचोरी करणाऱ्या वाहनधारकांवर कारवाई करण्याबाबत

**(१६)** * **९९४५ श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील रस्ते कराचे प्रमाण इतर राज्यांच्या तुलनेत अधिक असल्याने विशेषतः आलिशान गाड्यांची नोंदणी शेजारील केंद्रशासित प्रदेश दादरा-नगर हवेली (DN-०९) येथे करून कर चोरी केली जात असल्याची बाब माहे एप्रिल २०२६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबई, पुणे, ठाणे आणि अहिल्यानगर यांसारख्या शहरांत परराज्यातील नोंदणी असलेली अनेक महागडी व आलिशान वाहने नियमांचे उल्लंघन करून वर्षानुवर्षे महाराष्ट्राच्या रस्त्यांवर धावत असल्यामुळे राज्याचा अधिकृत रस्ते कर बुडविण्यात येत असल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मोटार वाहन कायद्यानुसार परराज्यातील वाहन महाराष्ट्रात १२ महिन्यांपेक्षा जास्त काळ राहिल्यास त्याची नोंदणी महाराष्ट्रात करणे अनिवार्य असतानाही, अशा वाहनांवर प्रादेशिक परिवहन विभाग (R.T.O.) व तपासणी नाक्यांमार्फत पुरेशी प्रभावी कारवाई न झाल्यामुळे राज्याच्या महसुलाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, परराज्यातील नोंदणी असलेल्या वाहनांमुळे राज्याच्या महसुलाचे नुकसान होत असून, सदर बेकायदेशीर प्रकारांमुळे कर भरणाऱ्या प्रामाणिक स्थानिक वाहनधारकांवर अन्याय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून झाले, चौकशीच्या अनुषंगाने कर चोरी करणाऱ्या वाहनधारकांवर कारवाई करण्याबाबत तसेच महाराष्ट्रातील रस्ते कराच्या संरचनेत सुसूत्रता आणण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रताप सरनाईक :** (१) हे खरे आहे.
(२), (३), (४) व (५) महाराष्ट्र राज्यालगतच्या काही राज्यांमध्ये कराचे प्रमाण हे काही प्रमाणात कमी आहे. परंतु, राज्यात होणाऱ्या वाहनांच्या नोंदणीवर मोठ्या प्रमाणावर परिणाम झाल्याचे दिसून येत नाही. मोटार वाहन अधिनियम, १९८८ मधील तरतुदीनुसार एका राज्यात नोंदणी झालेले वाहन दुसऱ्या राज्यात १ वर्षापेक्षा जास्त वापरण्यात येणार असेल तर त्या राज्याचा कर भरणे बंधनकारक आहे.

अशा प्रकारे इतर राज्यात नोंदणी झालेल्या परंतु महाराष्ट्र राज्यात वाहतूक करणाऱ्या वाहनांवर परिवहन विभागामार्फत नियमितपणे कारवाई करण्यात येते.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील वाहनांवर बेकायदेशीररित्या दिवे व सायरन वापरणाऱ्या वाहनचालंकावर कारवाई करण्याबाबत

**(१७) * १००३९ श्री.हेमंत पाटील :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील खाजगी तसेच अनधिकृत वाहनांवर अधिकृत परवानगी नसतानाही लाल, निळे किंवा पिवळे दिवे (डोम लाईट्स/फ्लॅशर्स) आणि सायरनचा बेकायदा पध्दतीने वापर केला जात असल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, खासगी वाहनांवर परवानगी नसतानाही 'महाराष्ट्र शासन', पोलीस इ. नावाची पाटी किंवा लोगो वापरणे पूर्णपणे बेकायदेशीर असून, अशा प्रकारच्या बेकायदेशीर वापरामुळे व्ही.आय.पी. (VIP) वाहनांबाबत सामान्य नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण होऊन शहरांमधील वाहतूक व्यवस्थेवर आणि सुरक्षेवर विपरित परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मुंबई वाहतूक पोलिसांनी नुकतीच एक विशेष मोहीम राबवून अशा अनेक अनधिकृत वाहनांवर दंडात्मक कारवाई केली असून, त्यांच्यावरील लुकलुकणारे दिवे व सायरन जप्त केले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मुंबईच्या धर्तीवर राज्यातील इतर सर्व प्रमुख शहरे आणि जिल्ह्यांमध्येही बेकायदेशीररित्या दिवे व सायरन लावणाऱ्या तसेच बेकायदेशीर लोगो वापरणाऱ्या वाहनांविरुध्द विशेष मोहीम राबविण्याचे शासनाच्या विचाराधीन असून अशा वाहनांवर मोटार वाहन कायद्यांतर्गत कारवाई करण्याबाबत व अनधिकृत वाहने जप्त करणे, तसेच या गुन्ह्याची पुनरावृत्ती झाल्यास संबंधित वाहनाची नोंदणी व चालकाचा परवाना रद्द करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रताप सरनाईक :** (१) व (२) अंशत: खरे आहे.
(३) मुंबई वाहतूक पोलीस विभागाकडून दिनांक ०१/०१/२०२६ पासून नियमित विशेष मोहिम राबवून वाहनांवर बेकायदेशीर पध्दतीने लाल, निळे किंवा पिवळे लुकलुकणारे दिवे (डोम लाईट्स) लावणाऱ्या व सायरन वापरणाऱ्या वाहन चालकांविरुध्द कारवाई करण्यात आली असून आतापर्यंत १४९६ दिवे व २ सायरन जप्त करण्यात आले आहेत.
(४) परिवहन विभाग व वाहतूक पोलीस विभाग यांचेकडून वाहतूकीचे नियम मोडणाऱ्या वाहन चालकांवर नियमित कारवाई करण्यात येते. सर्व प्रादेशिक व उप प्रादेशिक परिवहन कार्यालयातील वायुवेग पथकाद्वारे एप्रिल, २०२५ ते मार्च, २०२६ या कालावधीत वाहनांवर बेकायदेशीर पध्दतीने लाल, निळे किंवा पिवळे लुकलुकणारे दिवे (डोम लाईट्स) लावणाऱ्या व सायरन वापरणाऱ्या ९८ वाहनांवर मोटार वाहन अधिनियम व नियमान्वये कारवाई करुन रुपये ३७५००/- इतका दंड वसूल करण्यात आला आहे. तसेच पाटी किंवा लोगो वापरणाऱ्या १५ वाहनांवर कारवाई करुन रुपये ९०००/- इतका दंडा वसूल करण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## ठाणे जिल्ह्यातील आदिवासी बांधवांकडे आधार कार्ड नसल्याने शासकीय योजनांच्या लाभापासून वंचित असल्याबाबत

**(१८) * १०१२१ श्री.मिलिंद नार्वेकर :** सन्माननीय **माहिती तंत्रज्ञान मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शहापूर, भिवंडी, मुरबाड, कल्याण व अंबरनाथ तालुक्यांतील (जि.ठाणे) सुमारे ८ हजार २९४ आदिवासी बांधवांची आधार नोंदणी अद्याप प्रलंबित असल्यामुळे त्यांना अन्न सुरक्षा, आरोग्य, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (मनरेगा), घरकुल तसेच इतर शासकीय कल्याणकारी योजनांच्या लाभापासून वंचित राहावे लागत असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, 'श्रमजीवी संघटना-महाराष्ट्र' यांनी दिनांक २ एप्रिल, २०२६ रोजी ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयास निवेदन सादर करून सदर समस्येकडे शासनाचे लक्ष वेधून विशेष आधार नोंदणी व अद्ययावतीकरण शिबिरे आयोजित करण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त निवेदनाची दखल घेऊन उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन), ठाणे यांनी दिनांक ९ एप्रिल, २०२६ रोजी सर्व तहसिलदार व गटविकास अधिकाऱ्यांना 'श्रमजीवी संघटना-महाराष्ट्र' यांच्या पदाधिकाऱ्यांशी समन्वय साधून विशेष आधार नोंदणी व अद्ययावतीकरण शिबिरे आयोजित करण्याबाबत निर्देश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर शिबिरांच्या माध्यमातून आतापर्यंत किती आदिवासी बांधवांची आधार नोंदणी अथवा अद्ययावतीकरणाची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली व उर्वरित पात्र लाभार्थ्यांची नोंदणी पूर्ण करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आशिष शेलार :** (१) हे अंशत: खरे आहे.

शहापूर, भिवंडी, मुरबाड, कल्याण व अंबरनाथ तालुक्यांतील एकूण १२४१ आदिवासी कुटुंबाकडे आधारकार्ड नसल्याने त्यांना अन्न सुरक्षा योजनेचा लाभ देणेकामी अडचणी येत असल्याचे जिल्हाधिकारी, ठाणे यांच्याकडून प्राप्त अहवालात नमूद करण्यात आले आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) होय, हे खरे आहे.
(४) व (५) जिल्हाधिकारी, ठाणे यांच्याकडून प्राप्त अहवालानुसार शहापूर, भिवंडी, मुरबाड, कल्याण व अंबरनाथ तालुक्यात विविध ठिकाणी एकूण ३० शिबीरे आयोजित करण्यात आली होती. सदर शिबिरांमधून एकूण ५५३ आदिवासी नागरिकांची आधार नोंदणी झाली असून ४५० आदिवासी नागरिकांचे आधार अद्ययावतीकरण झाले आहे.

- सदर कार्यवाहीदरम्यान असे निदर्शनास आले की, बहुतांश आधार कार्ड नसलेले लाभार्थी हे १८ वर्षावरील असून त्यांच्याकडे आधार नोंदणीसाठी आवश्यक कागदपत्रांची उपलब्धता नाही. त्यामुळे विशेष बाब म्हणून तहसिलदार, गटविकास अधिकारी व तालुका आरोग्य अधिकारी यांच्या संयुक्त स्वाक्षरीचे प्रमाणपत्र आधार नोंदणीसाठी ग्राह्य धरण्याबाबत जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे दिनांक १२/०५/२०२६ रोजीच्या पत्रान्वये मा.उपसंचालक, UIDAI प्रादेशिक कार्यालय, मुंबई यांना विनंती करण्यात आली होती.
- तथापि, UIDAI यांनी प्रस्तावित प्रमाणपत्र हे आधार नोंदणीसाठी विहित कागदपत्रांच्या यादीशी सुसंगत नसल्याने त्यास मान्यता देता येणार नसल्याचे दिनांक २१/०५/२०२६ रोजीच्या ईमेल संदेशाव्दारे कळविले आहे.
- ठाणे जिल्ह्यात सध्या १८ वर्षावरील व्यक्तीच्या आधार नोंदणीची सुविधा असलेल्या फेवळ ०४ आधार किट कार्यरत असून सदर बाब लक्षात घेऊन जिल्हाधिकारी, ठाणे यांनी २५ आधार केंद्रांवर १८ वर्षावरील व्यक्तीच्या आधार नोंदणीची सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत आयुक्त, इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुध्दिमत्ता आयुक्तालयास विनंती केली आहे.
- सदर विनंतीच्या अनुषंगाने आयुक्त, इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुध्दिमत्ता आयुक्तालय यांनी संचालक, UIDAI प्रादेशिक कार्यालय, मुंबई यांना संबंधित २५ केंद्रांना आवश्यक परवानगी देण्याबाबत शिफारस केली आहे.
- अतिरिक्त आधार केंद्रांना मान्यता प्राप्त झाल्यानंतर जिल्हाधिकारी कार्यालय/तहसिल कार्यालय यांच्याकडून जनजागृती मोहीम व स्थानिक प्रशासनाच्या समन्वयातून उर्वरित पात्र आदिवासी नागरिकांची आधार नोंदणी पूर्ण करून त्यांना आधार कार्ड उपलब्ध करून देण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे.

----------------

## मसावद (ता.शहादा, जि.नंदुरबार) परिसरामध्ये अनधिकृत वीटभट्ट्या सुरू असल्याबाबत

**(१९) * १०१७६ श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, श्री.अमित गोरखे :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मसावद (ता.शहादा, जि.नंदुरबार) परिसरामध्ये मोठ्या प्रमाणात वीटभट्ट्या सुरू असून, यातील बहुतांश वीटभट्ट्या महसूल व प्रदूषण नियंत्रण मंडळाची कोणतीही शासकीय परवानगी न घेता अनधिकृतपणे सुरू असल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अनधिकृत वीटभट्ट्यांमधून निघणाऱ्या घातक धुरामुळे प्रदूषणात मोठ्या प्रमाणात वाढ होऊन मसावद परिसरातील हवेची गुणवत्ता खालावली असून तेथील व्यक्तींच्या व बालकांच्या आरोग्याला गंभीर धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शहादा तालुक्यातील सर्व अनधिकृत वीटभट्ट्यांची तपासणी करून त्यांना नियमाधीन करण्यासाठी अथवा नियमबाह्य भट्ट्यांवर दंडात्मक कारवाई करून त्या बंद करण्यासाठी तसेच पर्यावरण आणि परिसराचे रक्षण करण्यासाठी वीटभट्ट्यांच्या ठिकाणी आधुनिक तंत्रज्ञानाचा (उदा. झिग-झॅग तंत्रज्ञान) वापर बंधनकारक करण्याबाबत आणि प्रदूषण रोखण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही.

जिल्हा आरोग्य अधिकारी, नंदुरबार यांचेकडून प्राप्त अहवालानुसार सार्वजनिक आरोग्यास गंभीर धोका निर्माण झाल्याची बाब त्यांचे कार्यालयाच्या निदर्शनास आलेली नाही.

(३) तहसिलदार कार्यालय, शहादा यांचेकडून प्राप्त अहवालानुसार प्रश्नाधीन परिसरातील वीटभट्टी चालकांना पर्यावरणीय मानकांचे पालन करण्याबाबत सूचना त्यांचे कार्यालयामार्फ़त देण्यात आल्या आहेत.

- महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने, पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्रालय, भारत सरकार यांच्या दिनांक २२/०२/२०२२ अधिसूचनेनुसार केवळ झिग-झॅग तंत्रज्ञान व व्हर्टिकल शाफ़्ट या प्रकारच्या वीटभट्ट्या उभारण्यास परवानगी देणेबाबत दिनांक १०/०२/२०२३ रोजीच्या पत्रान्वये राज्यातील सर्व जिल्हाधिकारी कार्यालयास कळविले आहे.
- प्रश्नाधीन परिसरातील पारंपारिक वीटभट्ट्या या दिनांक २२/०२/२०२२ अधिसूचनेनुसार महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फ़त केवळ झिग-झॅग तंत्रज्ञान व व्हर्टिकल शाफ़्ट या प्रकारच्या वीटभट्ट्या उभारण्यास परवानगी देण्यात येते.
- महसूल व वन विभागाच्या दिनांक १०/०६/२०२६ रोजीच्या शासन निर्णयानुसार भारत सरकारच्या पर्यावरण, वने व वातावरणीय बदल मंत्रालयाच्या दिनांक २२/०२/२०२२ रोजीच्या अधिसूचनेमध्ये नमुद परिमान व उंचीपेक्षा कमी क्षमतेच्या वीटभट्टीसाठी सदर अधिसुचनेतील

तरतुदी कुंभार समाजातील व्यक्तीकडून पारंपारिक व पर्यावरणपूरक पध्दतीने चालविण्यात येणाऱ्या वीटभट्टीधारकांसाठी बंधनकारक असणार नाहीत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## परदेशी उच्च शिक्षणासाठीची निवड झालेल्या ७५ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती वितरीत केली नसल्याबाबत

**(२०) * १०२८९ डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती उमा खापरे, श्री.प्रसाद लाड, श्री.अमित गोरखे :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात परदेशात उच्च शिक्षणासाठी निवड झालेल्या ७५ इतर मागास बहुजन कल्याण विद्यार्थ्यांना शैक्षणिक सत्र उलटूनही अद्याप शिष्यवृत्तीची रक्कम प्राप्त झाली नसल्याची बाब माहे मे, २०२६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाकडून वेळेत शिष्यवृत्ती न मिळाल्यामुळे परदेशात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत असल्यामुळे त्यांना शिक्षण अर्धवट सोडून मायदेशी परत येण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, परदेशातील शिक्षणाचा खर्च अवाढव्य असल्यामुळे संबंधित विद्यार्थ्यांच्या सर्वसामान्य पालकांना कर्ज काढून आर्थिक अडचणीला सामोरे जावे लागत असून, प्रशासकीय दिरंगाईमुळे पात्र विद्यार्थ्यांवर अन्याय होत असल्याची तक्रार संबंधित पालकांनी केली असल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने ७५ पात्र विद्यार्थ्यांची प्रलंबित शिष्यवृत्ती वितरित करण्याबाबत, तसेच भविष्यात शिष्यवृत्ती वितरणास विलंब होऊ नये यासाठी शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही,

(३) परदेशी शिष्यवृत्ती योजनेतंर्गत दरवर्षी ७५ विद्यार्थ्यांची निवड केली जाते. त्याकरीता मागणीनुसार व गरजेनुसार निधी वितरीत करण्यात येतो. प्रसंगी परदेशातील शैक्षणिक संस्थांची फी वाढ, डॉलर व इतर चलनाच्या तूलनेत रुपयाचे अवमुल्यन, तसेच अपुरा निधी उपलब्ध झाल्यास वित्त विभागाकडून पुरवणी मागणी व पुनर्विनियोजनाद्वारे निधी उपलब्ध करुन घेतला जातो. निधी वितरणात प्रशासकीय दिरंगाई होवू नये म्हणून निधी वितरणाचे अधिकार संचालक, इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय, पुणे यांना प्रदान करण्यात आलेले आहेत. विद्यार्थ्यांची अडचण होऊ नये म्हणून विशेष दक्षता घेण्यात येत आहे. यासंदर्भात सद्य:स्थितीत अशा तक्रारी प्राप्त झालेल्या दिसून येत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वणी (जि.यवतमाळ) परिसरातील कोळसा डेपोंमुळे प्रदूषण होत असल्याबाबत

**(२१) * १०३३९ श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वणी (जि.यवतमाळ) परिसरात असलेल्या कोळसा डेपोंमुळे मोठ्या प्रमाणावर कोळशाची धूळ हवेत मिसळत असल्याने त्याचा परिणाम नागरिकांच्या आरोग्यावर, शेतीवर व स्थानिक व्यवसायावर होत असून याबाबत नागरिकांच्या तक्रारी केल्याचे माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोळशाचा परिणाम नागरिकांच्या श्वसनावर होऊन दमा, खोकला, त्वचारोग, डोळयांची जळजळ यासारख्या आरोग्याच्या समस्या निर्माण झाल्या असून, कोळशाच्या उडणाऱ्या धुळीमुळे किरकोळ दुकाने, हॉटेल, दुग्ध व्यवसाय यासारख्या लघु उद्योगावर परिणाम होऊन व्यावसायिकांना आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास सदर कोळसा डेपो मधील धूळ उडण्यावर प्रतिबंधात्मक उपाय (उदा. मातीचे ढिगारे झाकून ठेवणे, मातीवर पाणी मारणे) करण्याबाबत तसेच परिसरातील नागरिकांची वेळोवेळी आरोग्य तपासणी करण्यासाठी शिबिरे आयोजित करण्याची मागणी स्थानिकांकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यवतमाळ जिल्ह्यातील वणी परिसरातील प्रदूषण करणाऱ्या व्यावसायिकांवर दंडात्मक व फौजदारी प्रक्रियेअंतर्गत कारवाई करून या परिसरातील प्रदूषण कमी करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे आहे.

कोळसा वाहतूक व साठवणूकीमुळे होणाऱ्या प्रदूषणाबाबतच्या तक्रारी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे प्राप्त झाल्या आहेत.

(२) अंशत: हे खरे आहे.

जिल्हा आरोग्य अधिकारी, यवतमाळ यांचेकडून प्राप्त अहवालानुसार प्रश्नाधिन परिसरातील कोळसा डेपोमुळे कोळशाची धुळ हवेत मिसळत असल्याने नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होऊन दमा, खोकला, त्वचारोग, डोळयांची जळजळ यासारख्या आरोग्याच्या समस्या उद्‌भवत असतात. तथापि, फक्त कोळशाच्या धुळीमुळेच श्वसनाचे वा इतर आजार झाल्याचे निश्चित सांगता येत नाही.

जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, यवतमाळ यांचेकडून प्राप्त पत्रामध्ये, निरी व सिरकॉट या संस्थेकडून प्राप्त अहवालाचे मा.संशोधन संचालक डॉ. पंदेकृवि अकोला यांचे वतीने सहयोगी संचालक संशोधन, विभागीय कृषी संशोधन केंद्र मध्य विदर्भ विभाग, यवतमाळ यांनी दिलेल्या विश्लेषात्मक अहवालामध्ये धूळी कणांमुळे शेतजमिनीच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होतो, तसेच पिकांवर परिणाम होऊन उत्पादित होणाऱ्या मालास योग्य बाजारभाव मिळत नसल्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान होत असल्याचा निष्कर्ष अहवालात नमूद केला आहे.

(३) हे खरे नाही.

तथापि, जिल्हा आरोग्य अधिकारी, यवतमाळ यांच्याकडून प्राप्त अहवालामध्ये प्राथमिक आरोग्य कर्मचारी यांच्याकडुन घरोघरी जाऊन सर्वेक्षण करून आढळलेल्या रूग्णांवर शिबिरे आयोजित करून आरोग्य सेवा पुरविण्यात येत असल्याचे नमूद आहे.

(४) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने वणी परिसरातील कोळसा डेपोंच्या सर्वेक्षणादरम्यान एकूण ३९ कोळसा डेपोंची पाहणी केली. त्यापैकी ३३ कोळसा डेपो महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या दिनांक ०४/०९/२०१५ रोजीच्या परिपत्रकानूसार संमतीपत्राच्या कक्षेत येत असून त्यापैकी ०३ कोळसा डेपोंनी मंडळाकडून संमतीपत्र दिले आहे व उर्वरित ३२ कोळसा डेपोंच्या पाहणीदरम्यान कोळसा डेपोने प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा बसविली नसल्याचे आढळून आल्यामुळे मंडळामार्फत दिनांक २६/११/२०२५, दिनांक २७/११/२०२५, दिनांक २८/११/२०२५ व दिनांक २९/११/२०२५ रोजीच्या पत्रान्वये प्रस्तावित निर्देश व १ कोळसा डेपोला कारणे दाखवा नोटीस बजाविण्यात आली आहे.

(५) प्रश्नच उद्‌भवत नाही.

-----------------

## सोलापूर जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण विभागात दिव्यांग शाळांच्या निधी वितरणात अनियमितता झाल्याबाबत

**(२२) * १०४३० ॲड.अनिल परब :** सन्माननीय **दिव्यांग कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण विभागातील तत्कालीन जिल्हा समाजकल्याण अधिकारी, वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ता तसेच अन्य संबंधित अधिकाऱ्यांच्या कार्यपध्दतीबाबत आणि सोलापूर जिल्ह्यातील दिव्यांग शाळांना निधी वितरणातील अनियमिततांबाबत दिव्यांग आयुक्त कार्यालयामार्फत चौकशी करण्यात आली असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशी अहवालात संबंधित अधिकारी अथवा कर्मचाऱ्यांच्या जबाबदारीबाबत काही निरीक्षणे अथवा शिफारसी करण्यात आल्या आहेत काय, तसेच जिल्हा परिषदेच्या संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द कार्यवाही करण्याबाबत संबंधितांना सूचना देण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुसार शासनाने संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांविरुध्द कोणती प्रशासकीय, शिस्तभंगविषयक कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे :** (१) होय, अंशत: खरे आहे.

(२) नाही. तत्कालीन जिल्हा समाजकल्याण अधिकारी, सोलापूर यांनी दिनांक ८/१०/२०२४ ते ६/०५/२०२५ या कालावधीत केलेल्या बेकायदेशीर व भ्रष्ट कारभाराच्या चौकशीबाबत आयुक्त, दिव्यांग सक्षमीकरण यांनी प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण, पुणे यांना चौकशी करून अहवाल सादर

करण्याबाबत कळविले होते. प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण, पुणे यांनी काही कागदपत्रे उपलब्ध झाली नसल्याने अंतरिम अहवाल सादर केला आहे.

तद्नंतर, आयुक्त, दिव्यांग सक्षमीकरण यांनी उक्त प्रकरणाची संबंधितांकडून कागदपत्रे उपलब्ध करून सविस्तर अहवाल सादर करण्याच्या सूचना प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण, पुणे यांना दिल्या आहेत.

(३) प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण, पुणे यांनी सादर केलेल्या अंतरिम अहवालाच्या आधारे तत्कालीन जिल्हा समाजकल्याण अधिकारी, सोलापूर यांना दिनांक १३/०३/२०२६ रोजी कारणे दाखवा नोटीस देण्यात आली आहे.

अंतिम चौकशी अहवाल प्राप्त झाल्यानंतर संबंधितांवर आवश्यकतेनुसार शिस्तभंगविषयक कारवाई प्रस्तावित करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील वायू प्रदूषण कमी करण्यासाठी प्रभावी उपाययोजना करण्याबाबत

**(२३)** * **१०५०४ श्री.राजहंस सिंह :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील वायू प्रदूषणाची पातळी धोकादायक स्तरावर पोहोचली असून मुलुंड, सायन, देवनार व शिवाजीनगर आदी भागांमध्ये हवा गुणवत्ता निर्देशांक (AQI) अत्यंत खराब असल्याचे अधिकृत आकडेवारीनुसार माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शहरातील काही भागांत हवा गुणवत्ता निर्देशांक विहित मर्यादेत (१०० च्या खाली) असताना, कचरा व डंपिंग ग्राऊंडवरील आग, अनियंत्रित बांधकाम प्रकल्प आणि औद्योगिक उत्सर्जनामुळे इतर अनेक भागांत प्रदूषणाचा गंभीर धोका निर्माण झाला असून, वाहनांमुळे होणारे प्रदूषण रोखण्यासाठी तसेच शाळा व रुग्णालये यांसारख्या संवेदनशील क्षेत्रांचे संरक्षण करण्यासाठी प्रदूषण नियंत्रण मंडळ व महानगरपालिका यांच्यात योग्य समन्वयाचा अभाव असल्यामुळे प्रदूषण निवारण धोरणांची प्रभावी अंमलबजावणी होत नसल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबईत प्रदूषण वाढल्यास तातडीने लागू होणारा ‘ग्रेडेड ॲक्शन प्लॅन’ कितपत प्रभावीपणे राबविला जात आहे, तसेच नागरिकांच्या आरोग्यावरील (श्वसनाचे आजार, ॲलर्जी) दुष्परिणाम टाळण्यासाठी शासनाने रिअल-टाइम एअर क्वालिटी मॉनिटरिंग प्रणालीचा विस्तार व दीर्घकालीन कृती आराखड्याच्या अंमलबजावणीबाबत कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.

माहे एप्रिल, २०२६ मध्ये मुलुंड, सायन व शिवाजीनगर भागातील हवा गुणवत्ता निर्देशांक(AQI) हा (५१-१००) समाधानकारक व देवनार भागातील निर्देशांक हा (१०१-२००) मध्यम या श्रेणीत नोंदविला आहे.

(२) हे खरे नाही.

(३) बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून मुंबई वायू प्रदूषण शमन योजना-२०२३ ची प्रभावीपणे अंमलबजावणी केली जात आहे. शहरातील वायु गुणवत्ता निर्देशांक सलग ३ दिवस २०० पेक्षा जास्त झाल्यास बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून 'ग्रेडेड अक्शन प्लॅन' राबविण्यात येतो.

- बृन्हमुंबई महानगरपालिका हद्दीतील सर्व बांधकाम प्रकल्पांमध्ये Sensor based Air quality Monitors व LED Displays बसविणे अनिवार्य केले आहे.
- महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फ़त मुंबई शहर व मुंबई उपनगर भागात एकूण १४ ठिकाणी व बृन्हमुंबई महानगरपालिकेमार्फ़त ५ ठिकाणी व भारतीय उष्णदेशीय मौसम विज्ञान संस्था व भारतीय उष्णकटिबंधीय हवामानशास्त्र संस्था यांनी एकूण ९ ठिकाणी रिअल-टाइम एअर क्वालिटी मॉनिटरिंग प्रणाली (CAQMS) उभारलेली आहेत.
- आरोग्य विभाग, बृन्हमुंबई महानगरपालिका यांचेकडून प्राप्त अहवालानुसार, दवाखान्यात नोंद झालेल्या श्वसनाचे आजार, दमा,इ. आजाराच्या रुग्णसंख्येत लक्षणीय वाढ झाल्याचे दिसून येत आहे नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुणे शहरात नागरिकांना बनावट पोलीस चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्रे देऊन फसवणूक करण्यात येत असल्याबाबत

**(२४)** * **८८४८ श्री.योगेश टिळेकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरात पोलीस व्हेरिफिकेशनशी संबंधित अधिकृत पोर्टलशी साधर्म्य असणारी बनावट वेबसाइट तयार करून, नागरिकांना बनावट चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्रे देण्यात येवून नागरिकांची फसवणूक होत असल्याची बाब माहे, एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

**(२)** असल्यास, खासगी सुरक्षा कंपन्यांमध्ये किंवा संवेदनशील क्षेत्रांत (आयटी पार्क, बँका इ.) नोकरी मिळवण्यासाठी पोलीस पडताळणी अनिवार्य असते. बनावट रॅकेट चालवणारे लोक क्यूआर कोड (QR Code) असलेले हुबेहूब दिसणारे प्रमाणपत्र काही तासांतच उपलब्ध करून देत असल्यामुळे मूळ पडताळणी प्रक्रियेचे उल्लंघन होत असल्याने परिणामी गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या व्यक्तींना नोकरी मिळून सुरक्षेला धोका निर्माण होत असल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने ऑनलाईन पोलीस पडताळणी प्रणालीत फेरफार करणाऱ्या नागरिकांना बनावट चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्रे देणाऱ्या संबंधीतांवर कारवाई करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे;

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) पुणे शहरात पोलीस व्हेरिफिकेशनशी संबंधित अधिकृत पोर्टलशी साधर्म्य असणारी वेबसाईट तयार केल्याबाबतची बाब आढळून आलेली नाही.

तथापि, पुणे शहरात बनावट चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र तयार केले प्रकरणी चतुश्रृंगी पोलीस ठाणे अंतर्गत गु.र.नं.व कलम १४७/२०२६ भारतीय न्यास संहिता कलम ३१८, ३३६(३) प्रमाणे दिनांक ०९/०४/२०२६ रोजी तसेच लोणी काळभोर पोलीस ठाणे अंतर्गत अंतर्गत गु.र.नं.व कलम ७५/२०२६

भारतीय न्यास संहिता कलम ३१८(४), ३३६(३) व ३४०(२) प्रमाणे दिनांक १८/०२/२०२६ रोजी दोन इसमांवर गुन्हा दाखल करण्यात आला असून त्याअनुषंगाने पुढील तपास सुरु आहे.

चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्रांची विश्वासार्हता व सुरक्षितता वाढविण्याच्या दृष्टीने, महा-आयटी विभागामार्फत दिनांक ०५/११/२०२५ पासून संपूर्ण महाराष्ट्रातील पोलीस चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्रांवर (PCC) QR Code आधारित सुरक्षा सुविधा लागू करण्यात आलेली आहे. या सुविधेमुळे प्रमाणपत्राची सत्यता कोणत्याही ठिकाणाहून त्वरित पडताळून पाहता येते. तसेच, QR Code द्वारे प्रमाणपत्रातील माहितीची ऑनलाइन पडताळणी शक्य होत असल्याने प्रमाणपत्रांचे बनावटीकरण, फेरफार व छेडछाड यांना प्रभावी प्रतिबंध झाला आहे. परिणामी, नागरिक, नियोक्ते व संबंधित संस्था यांना अधिक विश्वासार्ह व पारदर्शक सेवा उपलब्ध झाली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुण्यातील पाषाण तलावात हजारो मासे मृत अवस्थेत आढळून आल्याबाबत

**(२५) * ९४५४ श्री.सचिन अहिर, श्री.सदाशिव खोत, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.अमित गोरखे, डॉ.परिणय फुके, श्री.हेमंत पाटील, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील पाषाण तलावमध्ये हजारो मासे मृत अवस्थेत आढळून आल्याची तसेच यमाईतुकाई (ता.पंढरपूर, जि.सोलापूर) येथील तलावातील शेकडो मासे मृत्यूमुखी पडले असल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पाषाण तलावाजवळ उभारण्यात आलेले १ एमएलडी क्षमतेचे सांडपाणी शुद्धीकरण केंद्र कार्यरत नसल्यामुळे तलावामध्ये दूषित पाणी सोडल्यामुळे माशांचा मृत्यू होत असल्याचे आढळून आले असून उक्त घटनांच्या अनुषंगाने पर्यावरण विभाग व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने पाण्याच्या गुणवत्तेची तपासणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे व चौकशीच्या अनुषंगाने तलावांचे प्रदूषण रोखण्याबाबत तसेच शुद्धीकरण केंद्राच्या कामकाजात हजगर्जीपणा करणाऱ्या संबंधितांवर गुन्हे दाखल करून कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे;

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) • माहे एप्रिल, २०२६ च्या सुमारास यमाई तलाव, पंढरपूर येथे मासे मृत पावल्याची घटना महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या निदर्शनास आली होती. त्यानुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत पाहणी करण्यात आली व सदर प्रकरणी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मडळामार्फत मुख्याधिकारी, पंढरपूर नगरपरिषद व पंचायत समिती, पंढरपूर यांना दिनांक ०६/०४/२०२६ रोजी समजपत्र बजावण्यात आले आहे.

• पुण्यातील पाषाण तलावात हजारो मासे मृत अवस्थेत आढळून आल्याबाबत प्रसारित बातमीच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत दिनांक १४/०४/२०२५ रोजी पुणे महानगरपालिकेच्या

पाषाण येथील घरगुती सांडपाणी प्रक्रिया केंद्राची पाहणी करण्यात आली होती. सदर पाहणीदरम्यान सांडपाणी थेट पाषाण तलावात सोडले जात असल्याचे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या निदर्शनास आले होते. त्यानुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत दिनांक २०/०४/२०२६ रोजी पुणे महानगरपालिकेस प्रस्तावित निर्देश बजावण्यात आले आहेत.

• पुणे महानगरपालिका यांचेकडून प्राप्त अहवालानुसार पाषाण तलावाजवळील १ एमएलडी क्षमतेच्या मैलापाणी शुद्धीकरण प्रकल्पाचे काम माहे जून, २०२५ च्या सुमारास पूर्ण झाल्यानंतर जुलै २०२५ ते ऑगस्ट २०२५ या दरम्यान प्रकल्पाचे ट्रायल रन घेण्यात आले होते व त्यानंतर माहे सप्टेंबर, २०२५ पासून सदर प्रकल्पाच्या देखभाल दुरुस्तीचा कालावधी सुरू झालेला होता.दरम्यान माहे फेब्रुवारी, २०२६ मध्ये सदर प्रकल्पामध्ये काही तांत्रिक अडचणी निर्माण झाल्याने प्रकल्प रिसायकल मोडवर ठेवण्यात आलेला होता.सदर प्रकल्प माहे मे, २०२६ पासून पुन्हा सुरू करण्यात आलेला आहे. तसेच पुणे महानगरपालिका हद्दीमधून येणाऱ्या अतिरिक्त सांडपाण्यावर बाणेर मैलापाणी शुद्धीकरण येथे प्रक्रिया करण्याचे नियोजित आहे.

• पुणे महानगरपालिकेकडून प्राप्त अहवालानुसार मैलापाणी शुद्धीकरण केंद्राच्या कामकाजात हलगर्जीपणा करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५६ (२)(फ) नुसार खातेनिहाय चौकशीकामी पुणे महानगरपालिका सेवेतून निलंबित करणेत आले होते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात दुधातील भेसळ रोखण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित तंत्रज्ञान विकसित करण्याबाबत

**(२६) * ९५६३ श्रीमती भावना गवळी, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्रीमती उमा खापरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात दुधातील भेसळ रोखण्यासाठी राष्ट्रीय डेअरी विकास बोर्डामार्फत विकसित ‘टेस्ट स्ट्रिप’ आणि कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित तपासणी यंत्रणा कार्यान्वित करण्याबाबत सूचना देण्यात आली असल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील ६० टक्के दूध अद्यापही असंघटित क्षेत्रातून येत असल्याने भेसळीचे प्रमाण वाढण्याची शक्यता विचारात घेऊन, अधिकाधिक दूध उत्पादकांना संघटित डेअरी व्यवस्थेत आणण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, प्रस्तावित कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित यंत्रणा आणि टेस्ट स्ट्रिप प्रत्यक्षरीत्या कधीपासून कार्यान्वित करण्यात येणार आहे व त्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे तसेच दुधातील भेसळ रोखण्यासाठी व नवीन तंत्रज्ञानाच्या अंमलबजावणीसाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे :** (१) होय, हे खरे आहे. राष्ट्रीय दुग्धविकास मंडळ व त्यांच्या उपकंपन्यांमार्फत राबविण्यात येत असलेल्या विविध दुग्धविकास प्रकल्पांचा आढावा घेण्यासाठी दिनांक २३ एप्रिल, २०२६ रोजी मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालय, मुंबई येथे बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत दुग्धजन्य पदार्थांमधील तसेच दुधातील भेसळ प्रभावीपणे ओळखण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आधारित, वापरकर्त्यास सुलभ अशी तंत्रज्ञान प्रणाली विकसित करण्याबाबत चर्चा करण्यात आली. यासाठी आयआयटी, मुंबई आणि राष्ट्रीय दुग्धविकास मंडळ यांच्या सहकार्याने कार्यवाही करण्याचे निर्देश मा.मुख्यमंत्री यांनी दिले असून, त्यानुसार आवश्यक समन्वय साधण्याबाबत दुग्धव्यवसाय विकास विभागास सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(२) केंद्र शासनाच्या सहकार मंत्रालय व मत्स्यव्यवसाय, पशुसंवर्धन आणि दुग्धव्यवसाय मंत्रालयांतर्गत असलेल्या पशुसंवर्धन आणि दुग्धव्यवसाय विभाग यांच्या समन्वयाने अधिकाधिक दूध उत्पादकांना संघटित डेअरी व्यवस्थेत आणण्यासाठी सन २०२४ मध्ये 'श्वेत क्रांती २.०' सुरू करण्यात आली. श्वेत क्रांती २.० हा एक सहकारी-नेतृत्वाखालील उपक्रम आहे. श्वेत क्रांती २.० अंतर्गत, महाराष्ट्रात सन २०२४-२५ ते सन २०२८-२९ या काळात २,४२८ नवीन दुग्ध सहकारी संस्था स्थापन करण्याचे उद्दिष्ट आहे.

(३) दुधातील भेसळ जलद पध्दतीने तपासण्यासाठी राष्ट्रीय दुग्ध विकास मंडळ टेस्ट स्ट्रिप विकसित करण्यावर काम करत आहे. टेस्ट स्ट्रिपचा अभ्यास यशस्वीपणे पूर्ण झाल्यानंतर, भेसळ ओळखणाऱ्या या चाचणी पट्ट्या डिसेंबर, २०२६ पर्यंत व्यावसायिक विक्रीसाठी उपलब्ध होण्याची शक्यता आहे.

राष्ट्रीय दुग्धविकास मंडळामार्फत दूध व दुग्धजन्य पदार्थांतील भेसळ ओळखण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आधारित, वापरकर्त्यांसाठी सोपी पध्दती विकसित करण्याच्या अनुषंगाने भारतीय तंत्रज्ञान संस्था, मुंबई यांच्या सहकार्याने आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे.

दुध व दुग्धजन्य पदार्थात भेसळ रोखण्यासाठी "अपर जिल्हाधिकारी" यांचे अध्यक्षतेखाली जिल्हानिहाय दूध भेसळ प्रतिबंध समिती दुग्धविकास विभागाच्या दिनांक २८ जून, २०२३ च्या शासन निर्णयान्वये गठीत केल्या आहेत. सदर समितींमार्फत धडक मोहिमा राबवून भेसळखोरांविरोधात कायदेशीर कारवाईचे सनियंत्रण आयुक्त, दुग्धव्यवसाय विकास व आयुक्त, अन्न व औषध प्रशासन यांचेमार्फत संयुक्तरित्या करण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## तळोजा एम.आय.डी.सी. क्षेत्रातील रासायनिक उद्योगांमुळे होणाऱ्या प्रदुषणामुळे नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण झाल्याबाबत

**(२७) * ९३५८ श्री.विक्रांत पाटील :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तळोजा परिसरातील रासायनिक उद्योगांमुळे होणाऱ्या प्रदूषणामुळे नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होत असून, कासाडी नदी पूर्णत: प्रदूषित झाल्याची तसेच उद्योगांनी कागदोपत्री दर्शविलेला ३३% हरित पट्टा प्रत्यक्षात अस्तित्वात नसल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पर्यावरण मंजुरीच्या अटीनुसार किमान ३३% क्षेत्रावर वृक्षारोपण न करणाऱ्या नियमभंग करणाऱ्या उद्योगांची संख्या किती आहे तसेच गत तीन वर्षांत प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिकाऱ्यांनी किती कंपन्यांची प्रत्यक्ष जागेवर जाऊन तपासणी केली आणि त्यामध्ये कागदोपत्री माहिती व प्रत्यक्ष स्थिती यात विसंगती आढळल्यास किती कंपन्या व जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात आली आहे,
(३) असल्यास, नदीमध्ये प्रक्रिया न केलेले प्रदूषित पाणी थेट सोडणाऱ्या कंपन्यांवर आतापर्यंत किती दंडात्मक कारवाई करण्यात आली व या कंपन्यांचे परवाने रद्द किंवा स्थगित करण्याबाबत तसेच "Zero Discharge" धोरण तातडीने लागू करण्याबाबत व कासाडी नदी पूर्णतः प्रदूषणमुक्त करण्यासाठी शासनाने कोणती कालमर्यादा निश्चित केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व वारंवार तक्रारी करुनही तळोजा एम.आय.डी.सी. क्षेत्रातील रासायनिक उद्योगांमुळे होणारे प्रदूषण रोखण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे अंशत: खरे आहे.

• कासाडी नदी प्रदूषित झाल्याबाबतची तक्रार माहे एप्रिल, २०२६ व माहे मे,२०२६ रोजी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे प्राप्त झाली होती. तथापि, उद्योगांनी कागदोपत्री दर्शविलेला ३३% हरित पट्टा प्रत्यक्षात अस्तित्वात नसल्याची कोणतीही तक्रार महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ वा पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाकडे प्राप्त झालेली नाही.

• उपायुक्त, पनवेल महानगरपालिका यांचेकडून प्राप्त अहवालानुसार पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील तळोजा एम.आय.डी.सी. परीसरातील रासायनिक उद्योगांमुळे होणाऱ्या प्रदूषणामुळे नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होत असल्याची कोणतीही तक्रार त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाली नसल्याबाबत कळविण्यात आले आहे.

(२) • पर्यावरण आघात मुल्यांकन अधिनियम, २००६ मधील तरतुदीनुसार पर्यावरण विषयक अनुमती केंद्रीय पर्यावरण, वने व जलवायु परिवर्तन मंत्रालय, भारत सरकार आणि पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाकडून उद्योगांच्या वर्गवारीनुसार प्रदान करण्यात येते.

• पर्यावरणीय अनुमतीतील तरतुदीनुसार प्रकल्प प्रर्वतकाने दर सहा महिन्याला अनुपालन अहवाल प्रादेशिक संचालक, केंद्रीय पर्यावरण, वने व वातावरणीय बदल मंत्रालय, नागपूर यांचेकडे देणे बंधनाकारक असते व त्याविभागाकडून अनुपालन अहवालाची शहानिशा केली जाते.

• तळोजा औद्योगिक क्षेत्रातील १४ उद्योगांनी पर्यावरणीय अनुमती घेतलेली असून सदर उद्योगांनी त्यांच्या प्रकल्प परिसरात व इतर ठिकाणी हरित पट्टा विकसित केलेला आहे.

(३) व (४) • तळोजा औद्योगिक परिसरात नूतन उद्योग उभारणीसाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत संमतीपत्र प्रदान करताना शुन्य निष्कासन (Zero Discharge) बाबत अटी व शर्तींचा समावेश करण्यात येतो.

• महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून कासाडी नदी प्रदुषणास प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष रित्या कारणीभुत असणाऱ्या उद्योगांवर नजिकच्या कालावधीत ५ प्रस्तावित व ६ अंतरिम आदेश पारित केलेले असून एकूण रक्कम रुपये १ लक्ष इतकी बँक हमी जप्त करण्यात आली आहे.

• तळोजा औद्योगिक वसाहतीमधील सर्व उद्योगांचे औद्योगिक सांडपाणी भूमीगत पाईपलाईनद्वारे सामाईक सांडपाणी प्रक्रिया केंद्रामध्ये एकत्रित केले जाते. कोणत्याही उद्योगाकडून प्रक्रियाकृत सांडपाणी थेट नदीत सोडले जात नाही. तथापि, काही वेळा औद्योगिक सांडपाणी वाहून नेणाऱ्या पाईपलाईन फुटणे, चेंबर चोक होणे अशा घटनांमुळे सांडपाणी गटारीद्वारे कासाडी नदीस मिसळले जाण्याच्या घटना निदर्शनास आल्या असून याबाबत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांना वेळोवेळी निर्देश देण्यात आले आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील धारावी परिसरात २५ वाहनांच्या जाळपोळीच्या घटनेची चौकशी करण्याबाबत

**(२८) * ८७९४ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धारावी (मुंबई) येथील हेरिटेज मैदान, आशिर्वाद सोसायटीमध्ये किरकोळ वादातून काही व्यक्तींनी २५ वाहने जाळली असून त्यात सुमारे २२ लाख रुपयांचे नुकसान झाले असल्याची बाब दिनांक ९ एप्रिल २०२६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी धारावी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे काय व यासंदर्भात चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने दोषींवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) आशिर्वाद बिल्डिंग नं. ०३, धारावी, मुंबई येथे दिनांक ०६/०४/२०२६ रोजी आयुब बाबु शेख उर्फ चिरा व इतर ०३ यांनी फिर्यादींच्या बिल्डिंगला आग लावण्याच्या हेतुने जाणीवपुर्वक व्देषभावनेतून तसेच नुकसान करण्याच्या उद्देशाने प्लॉस्टिक गोणीच्या सहाय्याने आग लावून सदर परिसरात राहणाऱ्या लोकांच्या जिवीतास धोका निर्माण करून तेथे लावलेल्या २५ दुचाकी जाळून एकूण २२,००,०००/- रूपयाचे नुकसान केले असल्याने धारावी पोलीस ठाणे, बृहन्मुंबई येथे दिनांक ०६/०४/२०२६ रोजी गु.र.क्र. ३१७/२०२६, भारतीय न्याय संहिता, २०२३ कलम ३२६ (ग), ३२४ (५), ३५१(२), १११(२)(ख), १११(४), ३(५) अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

(२) सदर गुन्हयाच्या तपासामध्ये ०४ आरोपींना अटक करण्यात आली असून ते सध्या न्यायालयीन कोठडीत आहेत. सदर प्रकरणी मा.न्यायालयात दिनांक १८/०६/२०२६ रोजी दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. फॉरेन्सिक सायन्स लॅबोरेटोरी (FSL) पथक, परिमंडळ-५ मार्फत सदर घटनास्थळावरील सीसीटीव्ही फुटेज पंचनामा करून जप्त केले आहे. तसेच सदर घटनास्थळावरील राखेचा नमुना रासायनिक विश्लेषक, कलिना मुंबई येथे चाचणी करीता पाठविण्यात आला आहे. सदर गुन्हयातील साक्षीदारांचे जबाब नोंद केले असून आणखी साक्षीदारांचे जबाब नोंद करणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा तपास सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील आदिवासी समाजासाठीची विशेष पदभरती प्रलंबित असल्याबाबत

**(२९) * १०३०२ डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्ह्यासह राज्यातील आदिवासी समाजासाठीच्या विशेष पदभरती मोहिमेतील १२,५०० पदे गत सात वर्षांपासून प्रलंबित असल्याची बाब माहे मे, २०२६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.सर्वोच्च न्यायालयाच्या सन २०१७ मधील निर्णयानुसार व त्यानंतर वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार सदर रिक्त पदे भरण्याची मुदत संपूनही अद्याप एकूण ६,८१० रिक्त जागांपैकी केवळ १,३४३ पदे भरण्यात आली असून उर्वरित ११,२२७ पदांची भरती प्रक्रिया प्रलंबित असल्यामुळे सुशिक्षित आदिवासी युवकांमध्ये तीव्र असंतोष व नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासकीय व निमशासकीय सेवांमध्ये आदिवासींसाठी राखीव असलेली अनेक पदे बिगर-आदिवासी व्यक्तींनी खोट्या व बोगस जात प्रमाणपत्रांच्या आधारे मिळवल्यामुळे मूळ पात्र आदिवासी उमेदवारांवर मोठा अन्याय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर पदभरती प्रक्रियेत झालेल्या विलंबाची आणि बोगस जात प्रमाणपत्रांच्या आधारे नोकरी मिळवणाऱ्या प्रकरणांची चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुषंगाने दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे व सर्व प्रलंबित व रिक्त पदांसाठी तात्काळ विशेष जाहिरात प्रसिध्द करून ही भरती प्रक्रिया एका निश्चित कालमर्यादेत पूर्ण करण्याबाबत आणि भविष्यात असे गैरप्रकार रोखण्यासाठी जात पडताळणी कायद्यात अधिक सुधारणा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) नाही, हे खरे नाही.

मा.सर्वोच्च न्यायालयाने विशेष अनुमती याचिका ८९२८/२०१५ (चेअरमन, फुड कॉर्पोरेशन ऑफ इंडिया (FCI) वि. जगदिश बलाराम बहिरा या याचिकेमध्ये दिनांक ६ जुलै, २०१७ रोजी दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने कार्यवाही करण्याकरीता शासन निर्णय दिनांक ०५/०६/२०१८ अन्वये मा.मंत्रिमंडळ उपसमिती नेमण्याची तरतूद करण्यात आली होती. या शासन निर्णयाविरुध्द मा.उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ येथे आदिवासी हक्क समितीने रिट याचिका ३१४०/२०१८ दाखल केली होती. सदर याचिकेमध्ये शासनाच्या वतीने दाखल केलेल्या शपथपत्रामध्ये विविध प्रशासकीय विभागांनी सादर केलेल्या माहितीनुसार शासन सेवेत दिनांक १५/०६/१९९५ ते ३१/०८/२०१५ या कालावधीमध्ये अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी आरक्षित असलेल्या पदावर नियुक्त झालेले तथापि, जातवैधता प्रमाणपत्र सादर न केलेले १२५२० कर्मचारी असल्याचे नमूद करण्यात आले होते.

(२) मात्र, सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय दिनांक २१/१२/२०१९ मधील निर्देशाप्रमाणे प्रशासकीय विभागांनी कार्यवाही करुन सादर केलेल्या माहितीनुसार अनुसूचित जमाती प्रवर्ग प्रमाणपत्राच्या आधारे शासन सेवेत नियुक्त झालेल्या तथापि, जातवैधता प्रमाणपत्र अवैध ठरल्याने / सादर करु न शकल्याने अधिसंख्य पदावर वर्ग झालेल्या कर्मचाऱ्यांची संख्या प्रत्यक्षात ६८६० असल्याचे निदर्शनास आले आहे व त्यापैकी १५१४ पदे भरण्यात आली आहेत.

(३) व (४) नाही, हे खरे नाही.

दिनांक २१/१२/२०१९ च्या शासन निर्णयानंतर अनुसूचित जमातीच्या प्रमाणपत्राच्या आधारे शासन सेवेत नियुक्त झालेल्या व संबंधित जात प्रमाणपत्र अवैध ठरलेल्या अधिकारी/ कर्मचाऱ्यांवर महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्यांच्या पडताळणीचे विनियमन), २००० च्या कलम १० व ११ अनुसार कार्यवाही करण्याबाबतची तरतूद दिनांक ०४/१०/२०२४ च्या शासन निर्णयामध्ये केली आहे.

शासन सेवेत पदभरतीची प्रक्रिया निरंतर सुरु असून याद्वारे अनुसूचित जमाती प्रवर्गाची पदे देखील भरण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील वांद्रे-कुर्ला संकुलातील नियोजीत पॉड टॅक्सी प्रकल्पामुळे रिक्षा चालकांच्या रोजगारावर परिणाम होणार असल्याबाबत

**(३०) * १०४६१ ॲड.अनिल परब :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी व प्रवाशांचा प्रवास सुखकर करण्यासाठी वांद्रे-कुर्ला संकुलात पीपीपी तत्त्वावर 'एलिव्हेटेड स्वयंचलित पॉड टॅक्सी प्रकल्प' राबवण्याचा निर्णय राज्य शासनाने माहे एप्रिल, २०२६ मध्ये किंवा त्यासुमारास घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकल्पामुळे वांद्रे आणि कुर्ला स्थानकादरम्यान वाहतूक करणाऱ्या सुमारे ८०० ते ९०० ऑटो रिक्षा चालकांच्या उदरनिर्वाहाचा गंभीर प्रश्न निर्माण होणार असल्याबाबत 'समर्थन' संस्थेने मा.मुख्यमंत्री, मा.परिवहन मंत्री आणि परिवहन सचिव यांच्याकडे दिनांक २४ एप्रिल २०२६ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वांद्रे आणि कुर्ला स्थानकादरम्यान मेट्रो, ओला-उबेर आणि बाईक टॅक्सीसारखी बरेच दळणवळणाची साधने उपलब्ध असतानाही एलिव्हेटेड स्वयंचलित पॉड टॅक्सी प्रकल्प' राबवण्याची कारणे काय आहेत तसेच मेट्रो, ओला- उबेर आणि बाईक टॅक्सीसारखी वाढत्या स्पर्धेमुळे आधीच आर्थिक संकटात अूसन स्थानिक रिक्षा चालकांना बेरोजगारीला सामोरे जावे लागणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त एलिव्हेटेड स्वयंचलित पॉड टॅक्सी प्रकल्प' राबविल्यास बांद्रा संकुल येथील रिक्षा व टॅक्सी चालकांना बेरोजगारीपासून वाचवण्यासाठी, त्यांना विकास प्रक्रियेत सामावून घेण्यासाठी वा त्यांचे पुनर्वसन करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रताप सरनाईक :** (१) होय.

(२) होय.

(३) व (४) पॉड टॅक्सी प्रकल्प हा वांद्रे-कुर्ला उपनगरीय रेल्वेस्थानकापासून उन्नत मार्गाने वांद्रे-कुर्ला संकुलाला जोडत असून प्रचलित ऑटो, टॅक्सी, ओला, उबेर व बाईक टॅक्सी वाहनांसारखा रस्त्याचा वापर करणार नाही.

वांद्रे-कुर्ला संकुल हे देशातील विकसित होत असलेले एक प्रमुख आर्थिक केंद्र आहे. या ठिकाणी कार्यरत मुनष्यबळ व विविध संस्थाना भेट देणारे लोक तसेच संकुलातील रहिवाशी व प्रवाशांना वाढत्या वाहतुकीमुळे वाहतूक कोंडीच्या समस्येचा त्रास होत आहे. त्यामुळे पर्यावरण पुरक व जलद वाहतूक प्रणाली उभारण्याच्या उद्देशाने स्वयंचलित पॉड टॅक्सी प्रकल्प उभारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

रिक्षा चालकांच्या सर्वांगिण विकासासाठी "धर्मवीर आंनद दिघे साहेब महाराष्ट्र प्रवासी वाहतूक चालक कल्याणकारी मंडळ" स्थापन करण्यात आले असून सदर मंडळामार्फत विविध कल्याणकारी योजना राबविण्यात येत आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे येथील व्हॅलेंटिना इंडस्ट्रीज कंपनीने हजारो गुंतवणूकदारांची आर्थिक फसवणूक केल्याबाबत

**(३१)** * **८८६३ श्री.योगेश टिळेकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) व्हॅलेंटिना इंडस्ट्रीज (जि.पुणे) या कंपनीने दोन हजारांहून अधिक गुंतवणूकदारांची फसवणूक करून ४३ कोटी रुपयांचा गैरव्यवहार केल्याप्रकरणी तसेच संबंधित कंपनीने शेअर ट्रेडिंग व विविध गुंतवणूक योजनांचे भारतीय प्रतिभूती आणि विनिमय मंडळ (SEBI) कडे कोणतीही वैध नोंदणी नसल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित कंपनीकडून गुंतवणूकदारांना मुदत ठेव (एफडी) योजनेंतर्गत दरमहा १ टक्का परतावा तसेच तीन वर्षांनंतर मुद्दल दुप्पट करून देण्याचे आमिष दाखवून फसवणूक केल्याप्रकरणी संबंधित कंपनीविरुध्द गुन्हा दाखल करुन कंपनी बंद करण्यात आली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने कंपनीमध्ये गुंतवणूक करून आर्थिक फसवणुकीस बळी पडलेल्या नागरिकांना आर्थिक दिलासा, गुंतवणुकीची परतफेड तसेच दोषींविरुध्द कठोर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) व्हॅलेंटिना इंडस्ट्रीज (जि.पुणे) या कंपनीने लोकांकडून अनियमित ठेवी स्वीकारण्यासाठी १ ते ५ टक्के परतावा देण्याचे आमिष दाखवून ठेवी गोळा केल्याचे निदर्शनास आले आहे. सदर प्रकरणी अलंकार पो.ठाणे,पुणे शहर येथे बॅनिंग ऑफ अनरेग्युलेटेड डिपॉझिट स्कीम ॲक्ट च्या कलम २१ अन्वये गुन्हा क्र.६८/२०२६ दिनांक १८/०४/२०२६ रोजी दाखल करण्यात आलेला आहे.

प्रस्तुत कंपनीने ठेवी स्वीकारण्याबाबत सेबी अथवा कोणत्याही प्राधिकृत शासकीय संस्थेकडून पूर्व परवानगी न घेता अंदाजे रुपये ४३,१९,९०,०००/- एवढया रकमेच्या ठेवी स्वीकारल्याचे निदर्शनास आले आहे.

सदर गुन्हयाचा तपास सुरु असून त्यानुसार कंपनीच्या संचालकांनी अनधिकृतरित्या चालविलेल्या ठेव योजनेतून प्राप्त रकमेची ३७ बँक खाती गोठविण्यात आली असून अंदाजे रुपये ८२,६१,३८,९३२/-

इतकी रक्कम गोठविण्यात आलेली आहे.

तसेच आरोपींनी पैसे स्वीकारत असल्याबाबतचे पार्टनरशिप डिड जप्त करण्यात आल्या आहेत. आरोपींच्या अकांऊटींग डाटाबाबतच्या हार्ड ड्राईव्ह या तांत्रिक विश्लेषनांकरीता न्याय वैद्यकिय प्रयोगशाळा येथे पाठविण्यात आल्या आहेत. आरोपींच्या बँक खात्यांचे फॉरेन्सीक ऑडीट करण्याची प्रकिया सुरु आहे.

सदर प्रकरणी वरील प्रमाणे तपास पूर्ण करुन गुंतवणूकदारांना त्यांचा रक्कमा परत करण्याच्या अनुषंगाने सक्षम प्राधिकारी यांच्याद्वारे बॅनिंग ऑफ अनरेग्युलेटेड डिपॉझिट स्कीम ॲक्ट अंतर्गत मा.नियुक्त न्यायालयासमोर अर्ज दाखल करुन पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जुहू येथे ट्रायो फॉरेक्स कंपनीच्या कर्मचाऱ्याच्या अपहरण प्रकरणी चौकशी करण्याबाबत

**(३२) * ९४६० श्री.सचिन अहिर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जुहू (मुंबई) येथे ट्रायो फॉरेक्स कंपनीच्या कर्मचाऱ्याचे अपहरण करून पोलिसांनी त्याच्याकडील १०,००० (दहा हजार) अमेरिकन डॉलर लुटल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कर्मचारी डॉलरची डिलिव्हरी देण्यासाठी जुहू येथील ग्राहकाकडे जात असताना, जुहू सर्कल येथील रोड जवळ त्यास अडवून, जबरदस्तीने गाडीत बसवून मारहाण करण्यात आली असल्याचे तसेच खोट्या गुन्ह्यात अडकवण्याची धमकी देत त्याच्याकडील डॉलरची बॅग घेण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणाची चौकशी केली आहे, चौकशीत काय आढळून आले आहे, चौकशीच्या अनुषंगाने सदर गंभीर गुन्ह्यात सामील असलेल्या दोषी पोलीस अधिकारी/कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) ट्रायो फॉरेक्स कंपनीचे कर्मचारी दिनांक २५/०३/२०२६ रोजी १०,००० अमेरिकन डॉलर इतक्या रकमेची डिलीवरी करण्याकरीता जूहू येथे गेले असता, त्यांना ०२ पोलीस शिपाई व ०३ अनोळखी साथीदारांनी ते पोलीस असल्याचे सांगून फिर्यादींना कारमध्ये बसवून दमबाजी करत फिर्यादींचे खिशामध्ये असलेले १०,००० अमेरिकन डॉलर्स (भारतीय चलनातील किंमत रुपये ९,३०,०००/-) आणि रुपये १५,०००/- भारतीय रूपये अशी एकूण रुपये ९,४५,०००/-रोख रक्कम जबरदस्तीने काढून घेतली असल्याने जुहू पोलीस ठाणे येथे आरोपींविरूध्द गु.र.नं.३५३/२०२६ भा.न्या.सं कलम १४० (३), ३१० (२), ११५ (२), ३०८ (२), २०४ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

(३) सदर गुन्हयात एकूण ०५ आरोपी असून, त्यापैकी ०२ आरोपी पोलीस कर्मचारी आहेत. सदर गुन्ह्यातील ०४ आरोपींना अटक करण्यात आली असून एका आरोपीचा शोध सुरू आहे. सदर गुन्ह्यात सहभागी असलेल्या ०२ आरोपी पोलीस शिपाई यांची चौकशी करून त्यांना बडतर्फ करण्यात आले आहे.

सदर गुन्ह्याच्या तपासामध्ये रुपये ८,२७,७००/- इतकी रक्कम हस्तगत करण्यात आली आहे. तसेच ०१ चारचाकी वाहन व ०१ दुचाकी वाहन हस्तगत करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील तात्पुरते अपंगत्व प्रमाणपत्र धारक दिव्यांग व्यक्ती शासकीय योजनांच्या लाभांपासून वंचित असल्याबाबत

**(३३) * ९५९० श्रीमती भावना गवळी, श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **दिव्यांग कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील दिव्यांग कल्याण विभागाने दिनांक २७ मार्च, २०२६ रोजी निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार, ज्या दिव्यांग व्यक्तींकडे 'तात्पुरते अपंगत्व प्रमाणपत्र' आहे, त्यांना शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचे लाभ मिळण्यास अपात्र ठरवण्यात आले असून सदर शासन निर्णयातील अटींमुळे राज्यातील विशेषतः ग्रामीण भागातील हजारो दिव्यांग बांधवांना मिळणारे रुपये २५०० मासिक आर्थिक सहाय्य अंत्योदय रेशन कार्ड व इतर मूलभूत सुविधा अचानक बंद झाल्याने जनजीवन विस्कळीत झाले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या दिनांक २७ मार्च २०२६ च्या शासन निर्णयानुसार राज्यातील ५०% पेक्षा जास्त दिव्यांग लाभार्थ्यांचे पेन्शन प्रभावित झाले असून UDID (Unique Disability ID) असलेल्या दिव्यांग लाभार्थींना योजनापासून अपात्र ठरविण्याची अट लागू होत असून अनेक व्यक्तींना जन्मतः किंवा कायमस्वरूपी अपंगत्व असूनही, केवळ वैद्यकीय तांत्रिक कारणांमुळे (उदा. पुनर्तपासणीची अट) त्यांना वैद्यकीय मंडळाकडून केवळ तात्पुरते प्रमाणपत्रच दिले जात असल्यामुळे शासनाच्या लाभांपासून वंचित रहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर शासन निर्णयाच्या अंमलबजावणीमुळे राज्यातील हजारो दिव्यांग लाभार्थ्यांचे मासिक मानधन (संजय गांधी निराधार योजना इ.) व इतर आर्थिक लाभ अचानक बंद करण्यात आले असून, कायमस्वरूपी व तात्पुरते अपंगत्व प्रमाणपत्र यामधील तांत्रिक तफावत लक्षात घेऊन, तात्पुरते प्रमाणपत्र असलेल्या गरजू व्यक्तींना योजनेचा लाभ पूर्ववत देण्याबाबत तसेच वादग्रस्त असलेल्या अटीं रद्द करण्यासाठी संबंधित शासन निर्णयामध्ये सुधारणा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) हे खरे नाही.

दिव्यांगत्व प्रमाणपत्रासंदर्भात ज्या प्रकरणांमध्ये दिव्यांगत्वामध्ये उपचार, पुनर्वसन अथवा इतर वैद्यकीय हस्तक्षेपांमुळे सुधारणा होण्याची शक्यता असते, अशा प्रकरणांमध्ये संबंधित मार्गदर्शक सूचनांनुसार तात्पुरते दिव्यांगत्व प्रमाणपत्र देण्यात येते. दिव्यांगत्व प्रमाणपत्र कायमस्वरूपी अथवा तात्पुरते देण्याबाबतचा निर्णय हा संबंधित वैद्यकीय मंडळाकडून प्रचलित नियम व वैद्यकीय निकषांच्या आधारे घेतला जातो.

(३) दिनांक १७ जून, २०२६ रोजीच्या शासन निर्णयान्वये तात्पुरते दिव्यांगत्व (Temporary UDID) प्रमाणपत्र असलेल्या दिव्यांग लाभार्थ्यांना विशेष सहाय्य योजनांचे लाभ सुरु ठेवण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. विलास आठवले**
**सचिव-३,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.